मंगळवार, १ मार्च २०२२
◆ वर्ष १४ ◆ अंक २२३
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ पाने ६ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

## छत्रपती शिवाजी महाराज देशाचे प्रेरणास्रोत -राज्यपाल



**जळगाव** : हिंदवी स्वराज्याचे संस्थापक आणि महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांबाबत केलेल्या विधानाबद्दल राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी जळगाव येथे प्रसारमाध्यमांशी बोलताना आपली भूमिका स्पष्ट केली. छत्रपती शिवाजी महाराज हे देशाचे प्रेरणास्रोत आहेत. मला इतिहासाची जेवढी माहिती होती, सुरुवातीच्या काळात जेवढे मी वाचले होते त्यावरून मला इतके माहीत होते की समर्थ रामदास स्वामी हे शिवरायांचे गुरू आहेत, पण इतिहासातील काही तथ्ये मला लोकांनी सांगितली आहेत, तर आता मी त्या तथ्यांबद्दल विचार करेन, असे राज्यपाल कोश्यारी यांनी माध्यमांना सांगितले. अशा प्रकारे राज्यपालांनी छत्रपती शिवाजी महाराजांविषयी आपली भूमिका स्पष्ट करून वादाला पूर्णविराम दिला आहे.

अंतरंग
'अभाविप'चा राज्य सरकारविरोधात घंटानाद/२
'पेण अर्बन बँकेची मालमत्ता धारकरांची प्रॉपर्टी नाही'/५
मयंक अग्रवाल पंजाब किंग्जचा नवा कर्णधार/६

# अखेर मविआ सरकार झुकले

■ खासदार संभाजीराजे यांचे उपोषण मागे



**मुंबई : प्रतिनिधी**

मराठा समाजाच्या दबावापुढे अखेर महाविकास आघाडी सरकार झुकले आहे. सरकारने मराठा समाजाच्या मागण्या मान्य केल्यानंतर छत्रपती खासदार संभाजीराजे भोसले यांनी सोमवारी (दि. २८) तीन दिवसांनंतर आपले उपोषण मागे घेतले.

राज्य सरकार आणि मराठा समाजाचे शिष्टमंडळ यांच्यात झालेल्या बैठकीत मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी मागण्या मान्य केल्या. या संदर्भात आराखडा आखण्यात आला आहे. राज्याचे गृहमंत्री दिलीप वळसे-पाटील, नगरविकासमंत्री एकनाथ शिंदे आणि सांस्कृतिकमंत्री अमित देशमुख यांनी खासदार संभाजीराजेंची आझाद मैदानात भेट घेऊन त्यांना मागण्या मान्य केल्याचे लेखी आश्वासन दिले.

मराठा आरक्षणाचा प्रश्न सर्वोच्च न्यायालयात आहे हे माहीत आहे, पण जेथे जेथे माझी गरज असेल तेथे मी पूर्ण सहकार्य करेन, अशी ग्वाही संभाजीराजे यांनी या वेळी दिली.

दरम्यान, राज्य सरकारला सहजपणे यापूर्वीच मान्य करता येण्यासारख्या मागण्यांसाठी छत्रपतींचे प्राण पणाला लागणे ही महाराष्ट्रासाठी शरमेची बाब आहे. महाविकास आघाडी सरकार किमान या छोट्या आश्वासनांचे पालन करेल आणि छत्रपतींची तसेच मराठा समाजाची पुन्हा फसवणूक करणार नाही अशी आशा असल्याची प्रतिक्रिया भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी व्यक्त केली आहे.

## पंतप्रधान मोदींनी विकासकामांच्या माध्यमातून जनतेची मने जिंकली

■ उपमुख्यमंत्री अजित पवारांकडून कौतुक

**पुणे : प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विकासकामांच्या माध्यमातून जनतेची मने जिंकली आहेत, अशा शब्दांत महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी त्यांचे कौतुक केले आहे. ते पुण्यात पत्रकार परिषदेत बोलत होते.

पंतप्रधान मोदींच्या विकासवादी धोरणाचे पुण्यात पत्रकार परिषदेत बोलताना उपमुख्यमंत्री पवार यांनी जाहीर कौतुक केले. पंतप्रधान मोदी जेव्हा सत्तेत आले तेव्हा त्यांनी विकासकामांच्या माध्यमातून लोकांची मने जिंकली. जे लोक





विकासाबद्दल बोलतात त्यांनाच जनता संधी देते, असे ते म्हणाले.

याचबरोबरच उपमुख्यमंत्री पवार यांनी ६ मार्च रोजी पंतप्रधान मोदी पुणे दौऱ्यावर येणार असल्याचे सांगून पंतप्रधान म्हणून नरेंद्र मोदी यांचा मान-सन्मान ठेवला गेला पाहिजे. पंतप्रधान देशाच्या कोणत्याही भागात जाऊ शकतात, तो त्यांचा अधिकार आहे. लोकशाही पद्धतीने निवडून ते पंतप्रधान झाले आहेत. त्यामुळे पंतप्रधान मोदी पुणे दौऱ्यावर आल्यानंतर त्यांच्या कार्यक्रमात पालकमंत्री म्हणून सहभागी होणार आहे, असे उपमुख्यमंत्री पवार यांनी स्पष्ट केले.

पंतप्रधान मोदी यांच्या पुणे दौऱ्यात सहभागी होण्याबाबत मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना विनंती केली आहे, मात्र त्यांची तब्येत पाहून ते निर्णय घेतील. पुण्यातील सर्वपक्षीय लोकप्रतिनिधी पंतप्रधान मोदींच्या कार्यक्रमात सहभागी होतील, असेही उपमुख्यमंत्री पवार म्हणाले.

## मंत्री प्राजक्त तनपुरे यांना ईडीचा दणका

### दोन ठिकाणची मालमत्ता जप्त

**नागपूर : प्रतिनिधी**

महाविकास आघाडी सरकारमधील ऊर्जा राज्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते प्राजक्त तनपुरे यांच्या दोन ठिकाणच्या मालमत्ता सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) जप्त केल्या आहेत. यात नागपूरमधील साखर कारखाना आणि अहमदनगरच्या जमिनीचा समावेश आहे.

विशेष म्हणजे राज्यमंत्री प्राजक्त तनपुरे यांच्या नागपूरमधील राम गणेश गडकरी साखर कारखान्यावरील मालमत्ता जप्तीच्या कारवाईचा फटका काँग्रेस आमदार आशिष देशमुख यांनाही बसला आहे. या साखर कारखान्याची ९० एकर जमीन आमदार देशमुख यांच्या तक्षशिला सिक्युरिटीजने खरेदी केली होती. ईडीने ही संपत्ती जप्त केली आहे. याशिवाय तनपुरेंची नगरमधील साडेचार एकर जमीनही ईडीने जप्त केली. जप्त करण्यात आलेल्या मालमत्तांची एकूण किंमत सुमारे १३ कोटी ४१ लाख रुपये आहे.

## शिवसेना पदाधिकारी, कार्यकर्त्यांचा भाजपमध्ये प्रवेश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्षाच्या कार्यप्रणालीवर आकर्षित होऊन शिवसेना उत्तर भारतीय सेल खारघर अध्यक्ष शैलेंद्र त्रिपाठी यांनी त्यांच्या अनेक समर्थकांसह रविवारी (दि. २७) भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला. भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी पक्षप्रवेशकर्त्यांचे स्वागत केले.



खारघर येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमध्ये झालेल्या पक्षप्रवेश कार्यक्रमास पनवेल महापालिकेचे नगरसेवक हरेश केणी, भाजपचे खारघर शहर अध्यक्ष ब्रिजेश पटेल, सरचिटणीस दीपक शिंदे, उत्तर भारतीय मोर्चा अध्यक्ष विनोद ठाकूर, उपाध्यक्ष सुमित सहाय, सोशल मीडिया सेल जिल्हा उपाध्यक्ष मोना अडवाणी, महिला मोर्चा सरचिटणीस साधना पवार, शिक्षक सेल संयोजक संदीप रेड्डी, युवा मोर्चा सरचिटणीस अमर उपाध्याय, विपूल चौटालिया, संदीप एकबोटे, मधुमिता जेना आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

या वेळी शिवसेना उत्तर भारतीय सेल खारघर शहर अध्यक्ष शैलेंद्र त्रिपाठी, संजय पांडे, चंद्रदेव उपाध्ये, राजेश मिश्रा, कृष्णा पांडे, शिवम, कुशवाह, सुशीला यादव, सनी महादेव, उमेश कुशवाह, पंकज पांडे, अशोक जोशी, जवाहर शहा यांनी भाजपचा झेंडा हाती घेतला. त्यांचे आमदार प्रशांत ठाकूर व अन्य मान्यवरांनी स्वागत केले.

### आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले स्वागत

## निवडक

### मुंबई पोलीस आयुक्तपदी संजय पांडे यांची वर्णी

**मुंबई :** येथील पोलीस आयुक्तपदी संजय पांडे यांची वर्णी लागली आहे. आधीचे पोलीस आयुक्त हेमंत नगराळे यांची बदली झाली आहे. पांडे हे महाराष्ट्राचे पोलीस महासंचालक होते, पण त्यांच्या नियुक्तीला विरोध झाल्यानंतर रजनिश सेठ यांची नियुक्ती करण्यात आली. यावर पांडे यांनी नाराजी व्यक्त केली होती. नाराजीनंतर त्यांना महाराष्ट्राच्या पोलीस महासंचालक पदावर बढती देण्यात आली. दरम्यान, राज्याच्या मुख्य सचिवपदी मनुकुमार श्रीवास्तव यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

## भाजप नेते वैकुंठ पाटील यांना जामीन मंजूर

**पेण, अलिबाग : प्रतिनिधी**



भाजप दक्षिण रायगड जिल्हा उपाध्यक्ष वैकुंठ पाटील यांच्यासह अन्य दोन जणांना अलिबाग सत्र न्यायालयाने पोक्सो प्रकरणात जामीन मंजूर केला आहे.

पेण विधानसभा मतदारसंघाचे आमदार रविशेठ पाटील यांचे पुत्र तथा भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष वैकुंठ पाटील यांच्यासह तिघांना पोक्सो गुन्ह्यातील प्रत सोशल मीडियावर व्हायरल केल्याबाबत अलिबाग सत्र न्यायालयाने तंत्रज्ञान अधिनियमन अंतर्गत तीन महिने कैद व पाच हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली होती. यावर वैकुंठ पाटील यांनी सोमवारी (दि. २८) अलिबाग न्यायालयात जामिनासाठी अर्ज केला असता त्यांची तत्काळ जामिनावर सुटका करण्यात आली.

दरम्यान, या प्रकरणाबाबत भाजप नेते वैकुंठ पाटील यांनी अलिबाग न्यायालयाच्या निकालाचा सन्मान करीत उच्च न्यायालयात दाद मागणार असल्याचे सांगितले.

## विवेक पाटील यांच्या जामीन अर्जावर आता ११ मार्चला सुनावणी

**पनवेल : प्रतिनिधी**



बोगस कर्ज प्रकरणामुळे अडचणीत आलेले कर्नाळा नागरी सहकारी बँकेचे अध्यक्ष आणि शेकापचे माजी आमदार विवेक पाटील यांच्या जामीन अर्जावरील सुनावणी ११ मार्चपर्यंत पुढे ढकलण्यात आली आहे. त्यामुळे यांचा तळोजा तुरुंगातील मुक्काम आणखी वाढला आहे.

मुंबईच्या सत्र न्यायालयात सोमवारी (दि. २८) झालेल्या सुनावणीच्या वेळी सक्तवसुली संचालनालयातर्फे (ईडी) ॲड. सुनील गोन्साल्वीस उपस्थित होते. विवेक पाटील यांच्यातर्फे ॲड. राहुल ठाकूर यांनी पुढील तारीख मिळण्यासाठी अर्ज दाखल केला. तो मान्य करून न्यायालयाने जामीन अर्जासाठी पुढील सुनावणी ११ मार्चला दुपारी २.४५ वाजता करण्याचा निर्णय दिला.

## स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव उपक्रमांतर्गत दिव्य गर्भसंस्कार-दिव्य भारत कार्यक्रम

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल महानगरपालिका व ब्रह्माकुमारीजच्या संयुक्त विद्यमाने स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव उपक्रमांतर्गत दिव्य गर्भसंस्कार-दिव्य भारत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. त्याचे उद्घाटन केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री डॉ. भारती पवार यांच्या हस्ते बुधवारी (दि. २) ऑनलाइन होणार आहे.

या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून आमदार प्रशांत ठाकूर, महापौर डॉ. कविता चौतमोल, सभागृह नेते परेश ठाकूर, आयुक्त गणेश देशमुख, उपमहापौर सीताताई पाटील, महिला व बालकल्याण सभापती हर्षदा उपाध्याय, स्थायी समिती अध्यक्ष ॲड. नरेश ठाकूर आदी उपस्थित राहणार आहेत.

स्त्रीरोगतज्ज्ञ व गर्भसंस्कार विशेषज्ञ डॉ. शुभदा नील व डॉ. ई. व्ही. स्वामिनाथन (मुंबई) हे महिलांना मार्गदर्शन करणार आहेत. पनवेलमधील महिलांसाठी मोफत हिमोग्लोबिन तपासणी व मोफत आयर्न गोळ्यांचे वाटप स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव उपक्रमांतर्गत करण्यात येणार आहे.



**पनवेल : ओबीसी नेते तथा ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ जे. डी. तांडेल यांना वाढदिवसानिमित्त महापालिका सभागृह नेते परेश ठाकूर यांनी सोमवारी शुभेच्छा दिल्या.**

## पनवेलमधील तामसईत उद्या पोपटी कविसंमेलन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कोकण मराठी साहित्य परिषद नवीन पनवेल शाखा व उत्कर्ष सांस्कृतिक, कला आणि क्रीडा मंडळ नवीन पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवारी (दि. २) सायंकाळी ५ वाजता पनवेल तालुक्यातील तामसई (दुंदरे) येथे पोपटी कविसंमेलन आयोजित करण्यात आले आहे.

हिरवागार निसर्ग आणि सोबतीला हवाहवासा वाटणारा गारवा अशा वातावरणात कवितांचा आस्वाद घेत पोपटीची चव चाखण्याचा आनंद अवर्णनीय असतो. असाच आनंद देणाऱ्या रायगडच्या मातीतील पोपटी कविसंमेलनाला अनेक वर्षांची परंपरा आहे. यंदाही या पोपटी कविसंमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे.

या पोपटी कविसंमेलनाला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कवी अरुण म्हात्रे, नाट्यनिर्माता विनोद नाखवा, (पान २ वर..)







# ‘अभाविप’चा राज्य सरकारविरोधात घंटानाद

## विद्यापीठ कायद्यातील बदल मागे घेण्याची जोरदार मागणी




**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र सरकारने लोकशाही पायदळी तुडवून गोंधळाच्या वातावरणात शिक्षणाच्या गुणवत्तेवर विपरीत परिणाम करणारे बदल करून विद्यापीठ कायदा असंवैधानिक पद्धतीने पारित केला आहे. त्यामुळे राज्य सरकारविरोधात अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या (अभाविप) वतीने सोमवारी (दि.२८) मुंबई विद्यापीठात घंटानाद आंदोलन करण्यात आले.

राज्य मंत्रिमडळाच्या झालेल्या बैठकीमध्ये विद्यापीठाच्या स्वायतत्तेवर घाला घालत महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायद्यामध्ये बदल करण्याचा निर्णय घेण्यात आला. या निर्णयावर कोणतेही चर्चा होऊ न देता त्या निर्णयाचे कायद्यात रूपांतर करून राज्य सरकारने बदल केलेला विद्यापीठ कायदा पारित केला. विद्यापीठांच्या स्वायतत्तेवर नियंत्रण आणण्याचा प्रयत्न राज्यशासन करीत आहे, हे स्पष्ट होते. या सर्व प्रकारांमुळे शिक्षणाची गुणवत्ता ढासाळून विद्यार्थ्यांना अंधारात लोटण्याचे काम हे राज्य सरकार करीत आहे. असे म्हणत अभाविप कोकण प्रदेशाच्या वतीने झोपेच सोंग घेतलेल्या गेंड्याच्या कातडीच्या महाविकास आघाडी सरकारला जागे करण्यासाठी अभाविपच्या वतीने मुंबई विद्यापीठात घंटानाद आंदोलन करण्यात आले.

अभाविपच्या वतीने ’विद्यापीठ स्वायत्तता बचाव आंदोलन’ हाती घेण्यात आले आहे. आंदोलना अंतर्गत अभाविप राज्यभरातील महाविद्यालयात स्वाक्षरी अभियान, तहसीलदार कार्यालयावर धरणे आंदोलन राबवत आहे. विद्यार्थ्यांनी या स्वाक्षरी अभियानास प्रतिसाद देत मोठ्या प्रमाणात स्वाक्षरी केल्या.

गेली महिनाभर अभाविप महाराष्ट्र भरात महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायद्यात करण्यात आलेले बदल मागे घ्यावे यासाठी आंदोलन करत आहे. स्वाक्षरी मोहीम, राज्यातील सर्व तहसीलदार, जिल्हाधिकारी कार्यालय येथे धरणे आंदोलन या नंतर सुद्धा विद्यापीठ कायद्यात करण्यात आलेले बदल सरकारकडून रद्द करण्यात आले नाहीत. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ करण्यात आलेले बदल त्वरित मागे घ्यावेत. अन्यथा अभाविप विद्यापीठांची स्वायत्तता अबाधित ठेवण्यासाठी महाराष्ट्र भरातून लाखो विद्यार्थ्यांचा मोर्चा घेऊन विधानभवनावर धडकेल, असा इशारा अभाविप कोकण प्रदेशमंत्री अमित ढोमसे यांनी या आंदोलनादरम्यान महाराष्ट्र सरकारला दिला.

# ग्रामस्थांची सरसकट सर्वच घरे नियमित करा

## आमदार मंदा म्हात्रे यांची मागणी



**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबईतील ग्रामस्थांनी गरजेपोटी बांधलेली २५० मी. पर्यंतची घरे नियमित करण्याचा राज्य सरकारने निर्णय घेतला व याबाबत शासन निर्णय आणला, परंतु नवी मुंबईतील ग्रामस्थांनी गरजेपोटी बांधलेली सर्वच घरे ‘आहे त्या स्थितीत’ सरसकट नियमित करावी, अशी मागणी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे व ठाणे जिल्हा पालकमंत्री, राज्याचे नगरविकास एकनाथ शिंदे यांच्याकडे यांच्याकडे केल्याचे आमदार मंदा म्हात्रे यांनी सीबीडी येथे पत्रकार परिषदेतून सांगितले.

आमदार मंदा म्हात्रे यांनी सांगितले की, गरजेपोटी बांधलेली घरे नियमित करण्याचा राज्य सरकारच्या या निर्णयात काही त्रुटी आहेत. ग्रामस्थांना वैयक्तिकरित्या आपल्या घरांचा विकास करण्याकरिता चार एफएसआय दिल्यास सोयीचे होईल. कमर्शियल बांधकामे केलेली असताना त्यांना रोजगारासाठी २५ टक्के कमर्शियलदेखील देणे गरजेचे आहे. याकरिता ग्रामस्थांनी गरजेपोटी बांधलेली सर्वच घरे ही विशिष्ट दर लावून नियमित करण्याची आवश्यकता आहे.

राज्याचे विरोधी पक्षनेते व तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी २०१५ पर्यंतची सर्व घरे नियमित करण्याचा निर्णय घेतला होता. मी २०१४ पासून सातत्याने लक्षवेधी, तारांकित प्रश्न, औचित्याच्या मुद्द्याद्वारे या प्रश्न विधानसभेत घेत आहे, त्याबाबत सततच्या बैठका व पाठपुरावा करीत आहे. हा प्रश्न मार्गी लागल्यास ग्रामस्थांना खऱ्या अर्थाने न्याय मिळेल, असे आमदार मंदा म्हात्रे यांनी सांगितले.

या पत्रकार परिषदेला माजी महापौर सुधाकर सोनावणे, भाजप महामंत्री डॉ. राजेश पाटील, विजय घाटे, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष दत्ता घंगाळे, प्रदीप गवस उपस्थित होते.

# खारघरमध्ये महिला कावड यात्रा उत्साहात





**खारघर : रामप्रहर वृत्त**

देशातील प्रथमच भव्य महिला कावड यात्रा खारघरमध्ये रविवारी (दि. २७) निघाली. विश्व मांगल्य सभेच्या राष्ट्रीय अध्यक्षा रेखाताई खंडेलवाल यांच्या मार्गदर्शनाखाली ही कावड यात्रा खारघरमधील उत्सव चौक ते सेक्टर १२ मधील शंकराच्या मंदिरापर्यंत्त आयोजित करण्यात आली होती. या यात्रेला भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट देत यात्रेचे आयोजन केल्याबद्दल आयोजकांचे कौतुक केले.

या वेळी पनवेल महापालिकेच्या महापौर डॉ. कविता चौतमोल, स्थायी समिती सभापती अ‍ॅड. नरेश ठाकूर, महिला मोर्चा तालुका अध्यक्ष रत्नप्रभा घरत, महिला व बालकल्याण सभापती हर्षदा उपाध्याय, प्रभाग समिती ‘अ’च्या सभापती संजना कदम, प्रभाग समिती ‘ब’च्या सभापती प्रमिला पाटील, नगरसेवक शत्रुघ्न काकडे, रामजी बेरा, प्रवीण पाटील, निलेश बावीस्कर, नगरसेविका चारुशीला घरत, दर्शना भोईर, नेत्रा पाटील, खारघर शहर अध्यक्ष ब्रिजेश पटेल, नलीनी हावरे, सुरेश हावरे, उज्वला कांबळे, दिपाली देशमुख, युवा नेते समीर कदम, विनोद घरत, गुरुनाथ गायकर, अमर उपाध्याय, महिला मोर्चाच्या लीना पाटील, बिना गोगरी, वर्षा प्रशांत ठाकूर, भाजप पनवेल शहर महिला मोर्चा अध्यक्ष वर्षा नाईक आदी उपस्थित होते.





**खारघर : भाजपच्या वतीने रंजन देबनाथ रंज यांच्या ‘रंजन संगीत की महफिल’चे आयोजन रविवारी करण्यात आले होते. हा कार्यक्रम रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमध्ये झाला. या वेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, नगरसेवक हरेश केणी, खारघर शहर अध्यक्ष ब्रिजेश पटेल, सरचिटणीस दीपक शिंदे, अमर उपाध्याय, विनोद ठाकूर, विपुल चोटालिया, साधना पवार, मोना अडवाणी, मधुमिता जेना, सुमित सहाय आदी उपस्थित होते.**

**पनवेल : रेल्वे–मस्को गेट ते सुभाषनगर या ५० वर्षे जुन्या पूर्वापार रस्त्याला खोपोली नगर परिषदेचे माजी उपनगराध्यक्ष स्व. सखाराम गेणू जाधव मार्ग व घरासमोरील चौकास जाधव मामा चौक असे नामकरण करण्यात यावे, अशी ग्रामस्थ मागणी करीत आहेत. त्यामुळे सर्व ग्रामस्थांच्या वतीने या मागणीचे पत्र राहुल सखाराम जाधव यांनी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांना दिले.**



# ओबीसी नेते जे. डी. तांडेल यांचा वाढदिवस विविध उपक्रमांनी साजरा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

ओबीसी जनमोर्चाचे उपाध्यक्ष, ज्येष्ठ अर्थतज्ञ जे. डी. तांडेल यांचा ५७वा वाढदिवस सोमवारी (दि. २८) विविध कार्यक्रमांनी साजरा झाला. सकाळी तळोजा एमआयडीसी येथील परमशांतीधाम वृध्दाश्रमातील वृद्धांना फळांचे वाटप करण्यात आले.

या वेळी ओबीसी जनमोर्चाचे अध्यक्ष माजी आमदार प्रकाशअण्णा शेंडगे, कार्याध्यक्ष चंद्रकांत बावकर, उपाध्यक्ष दशरथ पाटील, ओबीसी नेते अरुण खरमाटे, सरचिटणीस अरविंद डाफळे, चिटणीस व ज्येष्ठ पत्रकार दीपक म्हात्रे, अखिल आगरी समाज परिषदेचे सहचिटणीस डी. बी. पाटील, श्याम मोकल व जे. डी. तांडेल यांचे कुटुंबीय उपस्थित होते.



या कार्यक्रमात प्रकाशअण्णा शेंडगे यांनी जे. डी. तांडेल यांच्या कार्याचे कौतुक केले. ओबीसी जनमोर्चाचे जे. डी. तांडेल हे एक प्रमुख आधारस्तंभ आहेत, असे ते म्हणाले. या वेळी दशरथ पाटील, अरुण खरमाटे, चंद्रकांत बावकर, अरविंद डाफळे, दीपक म्हात्रे यांनी आपल्या भाषणात जे. डी. तांडेल यांनी महाराष्ट्रातील ओबीसी समाजासाठी यापुढेही कार्य करावे, अशा शुभेच्छा दिल्या. मेघा तांडेल यांनी उपस्थितांचे आभार मानले. या वेळी परमशांतीधाम वृद्धाश्रमास जे. डी. तांडेल यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त २५ हजार रुपयांची देणगी दिली. त्यांचे अभय वाघ यांनी आभार मानले.

दुपारी आगरी शिक्षण संस्थेचया पहिली ते सातवीपर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांना हायजेनिक किट्स वाटप करण्यात आले. या वेळी झालेल्या कार्यक्रमास शाळा चेअरमन श्रुती म्हात्रे, प्राचार्य पंकज भगत, यशवंत घरत, जगन्नाथ तांडेल, दीपक म्हात्रे, डी. बी. पाटील, श्याम मोकल तसेच शिक्षकवर्ग उपस्थित होता. या वेळी तांडेल यांच्या हायजेनिक किट्स वाटपाचा उपस्थितांनी गौरव केला. जे. डी. तांडेल यांनी शाळेतील इयत्ता सातवीच्या वर्गात प्रथम येणाऱ्यास खास पारितोषिक देण्यासाठी २५ हजार रुपयांचा चेक प्राचार्य पंकज भगत यांच्याकडे सुपूर्द केला. या पैशाच्या व्याजातून येणारी रक्कम प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यांस द्यावी, अशी सूचना त्यांनी प्राचार्यांना केली. अशा प्रकारे जे. डी. तांडेल यांचा वाढदिवस सामाजिक बांधिलकी भावनेने साजरा करण्यात आला.

पान १ वरून

## पनवेलमधील तामसईत उद्या पोपटी कविसंमेलन

‘कोमसाप’चे जनसंपर्क प्रमुख रायगडभूषण प्रा. एल. बी. पाटील, रायगड जिल्हाध्यक्ष सुधीर शेठ, ठाण्याचे माजी महापौर प्रेमसिंग राजपूत, नगरसेवक अ‍ॅड. मनोज भुजबळ, ‘कोमसाप’ नवीन पनवेल शाखेचे अध्यक्ष गणेश कोळी उपस्थित राहणार आहेत. पोपटी कविसंमेलन नि:शुल्क असून या वेळी कवींनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन उत्कर्ष सांस्कृतिक कला आणि क्रीडा मंडळाचे अध्यक्ष राकेश भुजबळ यांनी केले आहे.

गुंतवणूक

गुंतवणुकीवर आम्ही प्रतिमाह (५%) पाच टक्के नफा देतो.

**व्हॉट्सअ‍ॅप नंबर : ९६६५५४४३९५/ ९६८९८४३६३२**

**MAHATRANSCO** Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

## E-TENDER NOTICE

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| RFX | Description | Esti. Cost. |
|---|---|---|
| Tend-33/ 2021-22 7000021956 | Work of replacement of existing old 0.2 ACSR conductor of 100kV Apta-Thal, 100kV Apta-Jite & Jite-Thal with new 0.2ACSR conductor under EHV (O&M) Division Panvel. | **Rs. 274.88 Lakhs** |

EMD 1% of estimated cost & Tender fee Rs. 5000/- + GST. **Submission of bids from 28.02.2022 to 07.03.2022 up to 23:59 hrs, Opening date:- 08.03.2022.** For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/**
**Contact Person :** The Executive Engineer (Adm)Tel No. 022-27459624, Mob. No. 9167026141 E-mail ID se7200@mahatransco.in

**SUPERINTENDING ENGINEER**
**EHV (O&M) CIRCLE, PANVEL**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, आमचे पक्षकार एल्करीम डेव्हलपर्स अ‍ॅण्ड प्रोर्प्टीज प्रायव्हेज लिमीटेड तर्फे डायरेक्टर अब्रहम रन्जीत सिंह यांनी खालील वर्णन केलेली जमीन मिळकत त्या मिळकतीचे मालक मुजाहीद अब्दुल रऊफ खोत यांचेकडून कायम मालकी हक्का अन्वये विकत घेण्याचे ठरवले आहे.

**मिळकतीचे वर्णन :**
**मौजे. ममदापूर, ता. कर्जत, जि. रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार | |
|---|---|---|---|---|
| | | | रुपये | पैसे |
| ६० | ० | ०–४०–२० पो.ख. ०–०८–६० एकूण ०–४८–८० | ३ | ५६ |

सबब सदर बाबत कोणाचाही दान, गहाण, साठेकरार, खरेदीखत, ताबा, कब्जा, वहीवाट, बक्षीपत्र, लिज अथवा अन्य कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून २१ (एकवीस) दिवसांच्या आत खालील सही करणार अ‍ॅडव्होकेट यांच्याकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत दाखल करावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे तसे समजून वरील मिळकतीचा व्यवहार केला जाईल. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक : ०१/०३/२०२२ **सही/–**

**अ‍ॅड. अल्ताफ लियाकत डोंगरे**
(वकिल उच्च न्यायालय)
**पत्ता :** ब्लॉक नं. १०३, बुरहान प्लाझा कॉलेज रोड, आयुष नर्सिंग होम समोर ममदापूर, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ९०११५५५८०१

**MAHATRANSCO** Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

## E –TENDER NOTICE

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender specification. Tender fees Rs.500/- + GST**

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFx No.: 7000022357** **Tender No. : EE/EHV (O&M)/DN/PNL/ e-Tender-64/2021-2022.** RFx e-tender for supply of various colour oil paint, thinner & red oxide at various substation under EHV (O&M) Division Panvel. **Tender amount Rs. 1,48,873/- EMD amount Rs. 5,000/-.** |
| 2 | Online Downloading the RFx . | **28.02.2022, 17:00 Hrs. to 07.03.2022, 23:59 Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 07.03.2022 up to 23:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **08.03.2022 at 11.00 hrs. (if Possible)** |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The ADDL. Executive Engineer, (O) : Phone No. 022- 2746 5410.
**Note :** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**SD/-**
**(M.C. JOSHI)**
**EXECUTIVE ENGINEER**
**EHV(O&M) DN PANVEL**

पनवेल भाजपतर्फे

# जनहितार्थ

माहितीसाठी




**पनवेल महानगरपालिका हद्दीत मंगळवार, दि. १ मार्च २०२२ रोजी होणारे**

# कोरोना प्रतिबंधक लसीकरण

**(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)**

## कोविशिल्ड

**सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस (वयोगट :** १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. यूपीएचसी–१, गावदेवी पाडा, पनवेल
- २. आय.टी.एम. कॉलेज, नवीन पनवेल ■ ३. यूपीएचसी–४, सिडको समाज मंदिर, कळंबोली
- ४. यूपीएचसी–५, डी–मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
- ५. यूपीएचसी–६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे
- ६. टाटा अ‍ॅडव्हान्स सेंटर, खारघर

## कोव्हॅक्सिन

- ७. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली (१८+)
- ८. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली (१८+ ते १५+)
- ९. उपजिल्हा रुग्णालय, पनवेल (१८+)
- १०. आय.टी.एम. कॉलेज, नवीन पनवेल (१५+ ते १८+)
- ११. उपजिल्हा रुग्णालय, पनवेल (१५+ ते १८+)
- १२. यूपीएचसी–५, डी–मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर (१५+ ते १८+)

**Pricautionary dose हे फक्त दुसरा डोस घेऊन नऊ महिने पुर्ण झालेल्या HCW, FLW, व ६० वर्षांवरील Comorbid व्यक्तिंचेच लसीकरण केले जाईल याची नोंद घ्यावी.**

## निवडक

### उरण बस आगारात मराठी राजभाषा दिन



**उरण :** मराठी राजभाषा दिन उरण बस आगारात रविवारी (दि.२७) साजरा करण्यात आला. स्थानिक शिक्षण संस्था, एन. आय. हायस्कूलचे मराठी भाषेचे शिक्षक संजीव सदाशिव पाटील, शिक्षक नकर रामभाऊ भोईर, राजाराम निवृत्ती सातपुते, ज्येष्ठ नागरिक दलाल काका यांच्या हस्ते प्रतिमापूजन, दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाचे आयोजन उरण आगाराचे आगार व्यवस्थापक सतीश मालचे, स्थानक प्रमुख नरेंद्र भुंडे, लेखाकर रत्नाकर ढवळे, वरिष्ठ लिपिक सिद्धेश रसाळ व प्रमुख कारागीर विलास पाडवी यांनी केले.

### फुंडे हायस्कूलमध्ये सावरकरांना अभिवादन

**उरण :** फुंडे येथील तु. ह. वाजेकर विद्यालयात शनिवारी स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन करण्यात आले. प्राचार्य एम. एच. पाटील, उपमुख्याध्यापक व्ही. एल. नरवडे, पर्यवेक्षक एस. जी. म्हात्रे, ज्युनिअर कॉलेज प्रमुख व्ही. के. कुटे यांच्या हस्ते सावरकरांच्या प्रतिमेचे पूजन झाले. सर्व शिक्षक उपस्थित होते. वर्गात विद्यार्थ्यांच्या भाषणाचा कार्यक्रम झाला. वर्गशिक्षकांनी विद्यार्थ्यांना सावरकरांच्या देशभक्तीच्या कार्याची माहिती दिली.

# विविध उपक्रमांद्वारे मराठीचा जागर

**खारघर : रामप्रहर वृत्त**

कविवर्य वि. वा. शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांनी महाराष्ट्राच्या सांस्कृतिक क्षेत्रामध्ये मोलाचे योगदान दिले आहे. मराठी भाषा ही ज्ञानभाषा होण्यासाठी अथक परिश्रम घेतले आहे. ज्ञानपीठ पुरस्कार विजेते कविवर्य वि. वा. शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांचा जन्मदिन मराठी भाषा गौरव दिन म्हणून साजरा करण्यात येतो. यांचे औचित्य साधून जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघरमधील रामशेठ ठाकूर महाविद्यालयात अॅल्युमिन मीटतर्फे माजी विद्यार्थ्यांना सहभागी करून घेण्यात आले.

प्राचार्य डॉ. संजय मराठे यांनी सरस्वती पुजन केले व कविवर्य कुसुमाग्रजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून मानवंदना दिली. या कार्यक्रमामध्ये माजी विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. मराठी भाषा गौरव वर पोवाडा सादर केला. त्यातुन त्यांनी आपले मराठी भाषेवरील प्रेम व्यक्त केले तसेच म्हाविद्यालयातील आपल्या जुन्या आठवणींना उजाळा दिला.

प्राचार्य डॉ. संजय मराठे यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयातील अभ्यासिकेत मराठी पुस्तकांचा संग्रह विद्यार्थ्यांसाठी खुला करण्यात आला तसेच २६ फेब्रुवारी ते ५ मार्च २०२२ हा मराठी भाषा संवर्धन सप्ताह म्हणून साजरा करण्यात यावा, असे प्रतिपादन केले. या कार्यक्रमात महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.



रामशेठ ठाकूर महाविद्यालय



गव्हाण विद्यालय

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये कविश्रेष्ठ कुसुमाग्रज यांच्या जयंतीदिनी मराठी राजभाषा दिवस अर्थात मराठी भाषा गौरव दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

विद्यालयाच्या ज्युनिअर कॉलेज विभागाचे मराठी विभाग प्रमुख प्राध्यापक राजेंद्र चौधरी यांनी या वेळी मराठी भाषेच्या अलौकिक सामर्थ्य आणि क्षमतेचा गौरव करून मराठीसारखी एक समृद्ध भाषा आपली मातृभाषा असल्याचा अभिमान व्यक्त केला. यासोबतच प्रा. चौधरी यांनी मराठी भाषेच्या प्राचीन अस्तित्वाचे दाखले देऊन अगदी रामायण महाभारतामध्येही या भाषेचा उल्लेख असल्याचे सांगून ही अभिजात भाषा असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले. महान पराक्रमी राजे छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्यकारभाराची भाषा मराठी होती याचा आपण अभिमान बाळगला पाहिजे असेही त्यांनी आवर्जून सांगितले.

आपल्या प्रमुख भाषणात प्रा. राजेंद्र चौधरी यांनी ज्यांच्या जन्मदिनी मराठी राजभाषा दिन साजरा केला जातो त्या कविश्रेष्ठ कुसुमाग्रज यांच्या साहित्यिक जीवनाचा धावता वेधक आढावा घेतला. ज्युनियर कॉलेजचे विद्यार्थी मोठ्या संख्येने या वेळी उपस्थित होते.



**पनवेल : भाजप खांदा कॉलनी आणि ओम साई खांदेश्वर महिला व बाल मित्र मंडळाच्या वतीने खांदा कॉलनीत खांदेश्वर कोकण महोत्सव सुरू आहे. सेक्टर ८ येथील पोलीस ठाण्यासमोर मैदानावर आयोजित या महोत्सवाला महापालिकेच्या प्रभाग समिती 'ड'च्या सभापती अॅड. वृषाली वाघमारे यांनी भेट देऊन शुभेच्छा दिल्या. महोत्सवाच्या आयोजिका तथा उपमहापौर सीताताई पाटील यांनी त्यांचे स्वागत केले. या वेळी भाजप नेते अॅड. जितेंद्र वाघमारे, डॉ. शुभदा नील, काकासाहेब कुत्तरवडे, गणेश जगताप, साहिल रेळेकर, नरेश पाटील, सुनील पाटील, जीवन कांबळे आदी उपस्थित होते.**

## करंजाडेतील समस्या लवकरच मार्गी

### सिडकोकडून भाजप नेते किरण मुंबईकरांना आश्वासन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

करंजाडे येथील सांडपाणी नियोजन, रस्ते डांबरीकरण, गार्डनचे काम अशा विविध समस्यांबाबत भाजप तालुका चिटणीस किरण मुंबईकर यांनी सिडकोच्या कार्यकारी अभियंत्यांकडे पत्रव्यवहार केला होता. त्यानुसार सिडकोने पत्राची दखल घेत रस्त्यांचे डांबरीकरण, मँगो गार्डनच्या कामाला सुरुवात लवकर करण्यात येईल व सांडपाण्याचा प्रलंबित प्रश्नही लवकरच मार्गी लावण्यात येईल, असे नमूद केलेले पत्र मुंबईकर यांना पाठविले आहे.

करंजाडे सेक्टर १, २ व २ओ मध्ये डांबरीकरण करण्याबाबत मिक्स डिझाइनला मान्यता प्राप्तीसाठी पाठवण्यात आलेले आहे. मिक्स डिझाइनला मान्यता प्राप्त झाल्यानंतर लगेचच काम सुरू करण्यात येईल. करंजाडे सेक्टर २ मधील मँगो गार्डनचे काम करण्याबातचा प्रस्ताव वरीष्ठांकडे पाठविण्यात आलेला आहे. प्रस्तावास मान्यता प्राप्त झाल्यानंतर निविदा प्रक्रिया राबवून नंतर लगेचच गार्डनचे काम सुरू करण्यात येईल. करंजाडे सेक्टर १ व २ या भागातील सांडपाण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे. यासोबतच जी मलनिस्सारण वाहिनी गहाळ आहे त्याच्या नियोजनाचे काम सुरू आहे, असे सिडकोकडून मिळालेल्या पत्रात नमूद करण्यात आले आहे. यामुळे मुंबईकर यांच्या पाठपुराव्याला यश आले आहे.

## केंद्र शासनाच्या योजनेचा लाभ घ्या -अमर पाटील

**कळंबोली : वार्ताहर**

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने ई-श्रम सेवा सुरू केले आहे. या लाभदायक योजनेचा फायदा घेऊन आपण आपल्या पायावर उभे राहून स्वावलंबी बना, असे आवाहन नगरसेवक अमर पाटील यांनी केले.

मोदी सरकारच्या लाभदायक योजना जनतपर्यंत पोहचाव्या म्हणून लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर व गटनेते परेश ठाकूर यांच्या प्रयत्नातून ई-श्रम कार्ड, ई -श्रम महानोंदणी अभियान नगरसेवक बबन मुकादम व भाजपचे महिला नेत्या प्रिया मुकादम यांनी जनतेच्या सेवेत आणले आहे. त्यावेळी ते कळंबोली येथे अमर पाटील बोलत होते.



या वेबसाइट किंवा प्लॅटफॉर्मद्वारे असंघटित क्षेत्रातील कामगारांना दोन लाख रुपयांपर्यंत लाभ मिळू शकतो. असंघटित क्षेत्रातील सर्व नोंदणीकृत कर्मचाऱ्यांना प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजनेद्वारे अपघात विमा संरक्षण दिले जाईल, जे एक वर्षासाठी असेल. अपघाती मृत्यू आणि कायमचे अपंगत्व आल्यास दोन लाख रुपये देण्यात येणार आहेत. या योजनेचा लाभ जास्तीत जास्त लोकांना येता यावा ही आमची भूमिका असून या उद्देशाने आम्ही या ई-श्रम महानोंदणी अभियान आपल्या दारी आणले आहे, असे नगरसेवक बबन मुकादम यांनी सांगितले.

## राष्ट्रीय प्रश्नोत्तरी स्पर्धेत डॉ. कृष्णा देसाई प्रथम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त भारत रक्षा मंच तर्फे राष्ट्रीय प्रश्नोत्तरी स्पर्धा घेण्यात आली होती. या स्पर्धेत नवीन पनवेल येथील डॉ. कृष्णा के.देसाई यांनी प्रथम क्रमांक पटकाविला.

डॉ. देसाई त्यांना राष्ट्रीय मंच उपाध्यक्ष अॅड. रणजित सांगळे, राष्ट्रीय महिला मंच अध्यक्षा बिना गोगरी यांच्या हस्ते सन्मानीत करण्यात आले. या वेळी जेष्ठ विचारवंत ज्ञानेश्वर पाटील, इतिहासतज्ञ अमोल पाटील, बाळासाहेब पाटील, दीपक जाधव व इतर मान्यवर उपस्थित होते. या स्पर्धेमध्ये भारतातील विविध भागातून ६४३ स्पर्धकांनी सहभाग घेतला होता.



## सीकेटी विद्यालयात शुभचिंतन सोहळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) विद्यालय इंग्रजी माध्यमात इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांकरिता सोमवारी (दि. २८) शुभेच्छा चिंतन सोहळा आयोजित करण्यात आला होता.



कार्यक्रमाची सुरूवात सरस्वती पूजनाने झाली. यानंतर स्व. जनार्दन भगत आणि पिताश्री चांगू काना ठाकूर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. जीनल प्रजापत हिने नृत्यातून गणेश वंदना सादर केली. २९ फेब्रुवारी हा स्व. जनार्दन भगत यांच्या जयंतीचा दिवस म्हणून या सोहळ्यात स्व. जनार्दन भगत साहेबांना आदरांजली अर्पण केली गेली. प्रमुख पाहुणे म्हणून जयश्री देवधर उपस्थित होत्या. प्रास्ताविकात मुख्याध्यापक संतोष चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना भरपूर अभ्यास करा आणि विश्वासाने परिक्षेस सामोरे जा असे सांगत बोर्ड परीक्षेस शुभेच्छा दिल्या.

शुभम तिवारी, प्राजक्ता बांदेकर, शुभदा देशमुख, संचिता खोपकर, सानिका जाधव, आदित्य कुलकर्णी, निकिता भन्साळे, स्वरा पवार, जीनल प्रजापत, सई जोशी, साक्षी गुप्ता, जयेश भाईगडे, अथर्व चव्हाण, प्राची पाटील, अनन्या झा, यश पांडव, आरती गुप्ता, सिध्दी भोसले, साधिका मनसुरी या विद्यार्थ्यांनी आपले भावपूर्ण मनोगत व्यक्त करत शिक्षकांचे आभार मानले.

संचिता, यश आणि सई यांनी वर्गशिक्षक प्रकाश पांढरे, मंजुषा भगत आणि स्वाती काळे यांना पुष्पगुच्छ देऊन वंदन केले. प्रि-प्रायमरी सेक्शनच्या गीता जगताप यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. प्रमुख अतिथी जयश्री देवधर यांनी विद्यार्थ्यांना मनावर ताण न ठेवता परिक्षेस सामोरे जा असा संदेश दिला.


कार्यक्रमास सीकेटी प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापक निलिमा शिंदे, प्रि प्रायमरी सुपरवायझर संध्या अय्यर, तसेच इंग्रजी माध्यमिक सुपरवायझर निरजा अदुरी आदी उपस्थित होते.

सर्व दहावीच्या विद्यार्थ्यांना संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, अध्यक्ष अरूणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, सचिव डॉ. एस. टी गडदे, संस्थेचे सर्व पदाधिकारी, मुख्याध्यापक संतोष चव्हाण, पर्यवेक्षक, मार्गदर्शक शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी शुभेच्छा देण्यात दिल्या आहेत.

## रामशेठ ठाकूर महाविद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त व्याख्यान

**खारघर : रामप्रहर वृत्त**

खारघरमधील रामशेठ ठाकूर महाविद्यालयातील सायन्स असोसिएशनतर्फे सोमवारी (दि.२८) राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त वीर नर्मद दक्षिण गुजरात, सुरत येथील प्राध्यापक डॉ. विपुल सोमाणी यांचे वातावरणातील बदल व त्यांचे परिणाम याविषयी व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.




सुरूवात प्रा. सुकन्या ठोबरे यांच्या सुत्रसंचालनाने झाली तसेच प्राचार्य डॉ. संजय मराठे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. प्रा. रश्मी पाटील यांनी प्रास्ताविक केले तसेच प्रा. महेश्वरी झिरपे यांनी पाहुण्याची ओळख करून दिली. प्रा. नमिता सिन्हा यांनी आभार मानले.

कार्यक्रमाच्या आयोजनाबद्दल संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेचे सचिव डॉ. सिध्देश्वर गडदे यांनी आयोजकांचे कौतुक केले.

## पनवेलमध्ये रॅम्प वॉकद्वारे ज्वेलरीचे प्रदर्शन

### बी. बी. बांठिया ज्वेलर्सचा अनोखा उपक्रम






**पनवेल : वार्ताहर**

पनवेलमध्ये प्रथमच सप्तपदी वेडींग ज्वेलरी कलेक्शनच्या माध्यमातून नामांकित अशा तरुण व तरुणी वर्ग रॅम्प वॉक केले असून शहरातील सुप्रसिद्ध बी. बी. बांठिया ज्वेलर्स यांच्या माध्यमातून हा अनोखा उपक्रम राबविण्यात आला होता.

रायगड जिल्ह्यात प्रथमच ज्वेलरी फॅशन शोचे आयोजन आले होते. त्यामुळे पनवेल, उरणसह नवी मुंबई व रायगड परिसरातील नागरिकांमध्ये कमालीची उत्सुकता दिसुन आली. वेडिंग डिझाईन्स ग्राहकांपर्यंत पोहचवण्याच्या उद्देशाने या फॅशन शोचे आयोजन करण्यात आले होते.

या ज्वेलरी फॅशन शो चे नियोजन अथर्व मीडिया वर्ल्ड चे सर्वेसर्वा मिलिंद राणे यांच्या संकल्पनेतून साकारण्यात आले. प्रसिद्ध फॅशन शो दिग्दर्शक यश शेलार यांनी हे फॅशन शोसाठी दिग्दर्शन केले तसेच या दागिन्यांची घडणावळ ज्वेलरी कन्सल्टंट नवीन सदारंगानी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली होती. कोरोना प्रतिबंधक निर्बंध अद्यापही काही प्रमाणात लागू असल्याने मर्यादित प्रेक्षकांना प्रवेश दिला गेला होता. उपस्थित मान्यवरांचे स्वागत राजेश बांठिया यांच्यासमवेत गौरव बांठिया, वैभव बांठिया, सुयोग बांठिया आदींनी केले.



यानिमित्त पनवेल महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर, नगरसेवक राजू सोनी, डॉ. गिरीश गुणे व अॅड. मनोहर पाटील यांना जेम्स ऑफ पनवेल हा अॅवॉर्ड देऊन सन्मानित करण्यात आले. त्याचप्रमाणे इतर मान्यवरांनासुद्धा विविध अॅवॉर्ड देऊन गौरविण्यात आले.

अनेक नामांकित अशा मॉडेल यांनी या वेळी विविध दागिन्यांनी नटून रॅम्प वॉक केला व पनवेलकरांची मने जिंकली.

अशा प्रकारच्या उपक्रमामुळे अनेक तरुण व तरुणींना एक वेगळ्या क्षेत्रात वाव मिळाला आहे. अशा प्रकारचे आयोजन यापुढेसुद्धा करण्यात येईल, अशी माहिती अथर्व ग्राफीक्सचे मिलिंद राणे यांनी या वेळी दिली.

## निलिमा सहाणे ठरल्या दिशा सौंदर्यसम्राज्ञी



**पनवेल : प्रतिनिधी, वार्ताहर**

कामोठ्याच्या दिशा महिला मंच आयोजित दिशा सौंदर्यसम्राज्ञी निलिमा सहाणे तर पहिल्या रनर अप ठरल्या पूनम शेलार व दुसऱ्या रनरअप ठरल्या शमिका जाधव. १० महिलांना टायटल विनरने ही सन्मानित करण्यात आले. तृतीय पंथीयांविषयीचा समाजाचा असणारा दृष्टिकोन दूर व्हावा व माणूस म्हणून त्यांच्याबरोबर माणसासम वागूयात असा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला.

दिशा कल्चरल इव्हेंट्स प्रस्तुत दिशा महिला मंच आयोजित दिशा सौंदर्यसम्राज्ञी या सौंदर्यस्पर्धेचे आयोजन कामोठे येथे शनिवारी (दि. २६)आगरी हॉल येथे करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये एकूण २९ स्पर्धकांनी सहभाग नोंदवला होता.

ज्ञानेश्वर बनगर, विद्या घारे या कार्यक्रमास पाहुणे म्हणून उपस्थित होते. स्पर्धेचे परीक्षण धर्मेश कडू, श्रुणाल जाधव व नंदिता परिडा यांनी केले स्पर्धाकांनी ही संधी समजून स्वतःला सिद्ध करण्यासाठी मेहनत घेतली होती. मातोश्री हॉस्पिटलचे डॉ. स्नेहलता बाळासाहेब खडबडे, शिवश्री सचिन लावंड, सामाजिक कार्यकर्त्या डॉ. रुक्मिणी अर्जुन, रेणुका डिसुजा, मिना खाकी पावडरचे सीईओ मंदार पोतदार, शिवश्री सचिन लावंड, दिलिप पाटील, शाम कुलथे, जयकुमार डिगोले, रांगोत्सव सेलेब्रेशन, श्रीजिता बॅनर्जी, पल्लवी गायकवाड यांच्या सहकार्याने हा कार्यक्रम यशस्वी झाला. मिना खाकी कंपनीकडून उपस्थित मान्यवर व विजेत्यांना गिफ्ट ही देण्यात आले. आयोजक निलम आंधळे, उपाध्यक्ष विद्या मोहिते, स्वाती, खुशी सावर्डेकर आदी उपस्थित होत्या.

या स्पर्धेमध्ये बेस्ट कॉस्ट्यूम कल्याणी ठाकरे, बेस्ट हेअर वैशाली मोरे, बेस्ट वॉक मंजुषा दिलीप कदम, बेस्ट आय रेश्मा शिनारे, बेस्ट स्कीन आलका चौधरी, बेस्ट बेहेव्हिअर माया फापाळे, बेस्ट परसनॅलिटी कावेरी थोरात, बेस्ट फोटाजेनिक स्नेहल चेलेकर, बेस्ट कॉन्फिटेन्ट निवेदिता बारापात्रे, बेस्ट स्माईल मनिषा शिंदे या सर्व जणी टायटल विनर ठरल्या.

## संपादकीय

# ऑपरेशन गंगा

कीव्ह हे युक्रेनचे राजधानीचे शहर असल्यामुळे येथे अनेक आंतरराष्ट्रीय विद्यापीठे व शैक्षणिक संस्थांचे जाळे आहे. जगभरातून तेथे अनेक विद्यार्थी आणि विद्यार्थिनी शिकण्यासाठी येत असतात. खार्कीव्ह या शहराचा लौकिकदेखील शिक्षणाचे गाव असाच आहे. या दोन्ही ठिकाणी किमान २३ हजार भारतीय विद्यार्थी राहतात. त्यांना परत आणण्याचे भगीरथ कार्य केंद्र सरकारने हाती घेतले आहे. त्यानुसार शेकडो विद्यार्थी आता मायदेशी परतू लागले आहेत.

**रशिया आणि युक्रेनमध्ये पेटलेल्या भीषण युद्धाचा पाचवा दिवस उलटून गेला तरी या युद्धाची परिणती कशात होणार याचा अंदाज युद्ध तज्ज्ञांनाही अजुन आलेला नाही. या युद्धाच्या निमित्ताने संपूर्ण जग तिसऱ्या महायुद्धाच्या उंबरठ्यावर तर येऊन ठेपले नाही ना अशी भीती व्यक्त करण्यात येत आहे, तर दुसरीकडे येत्या काही तासांत युद्धविरामाची घोषणा होईल अशाही वावड्या उठत आहेत. युद्धाची झळ जगातील प्रत्येक देशाला लागत असली तरी रशियाच्या आक्रमणामुळे युक्रेन हा देश सर्वार्थाने भरडला जात आहे हे खरेच. युक्रेनची राजधानी कीव्ह आणि खार्कीव्ह या दुसऱ्या महत्त्वाच्या शहरात रशियन क्षेपणास्त्रांनी हाहाकार उडवला असून शेकडो इमारती जमीनदोस्त झाल्या आहेत. गेल्या आठवड्याभरात युक्रेनच्या जवळपास पाच लाख नागरिकांनी अन्य देशांत स्थलांतर केले असून राजधानी कीव्ह येथे राहणाऱ्या परदेशी नागरिकांची युद्धभूमीतून सुटका करून घेण्यासाठी जिवाच्या आकांताने धडपड सुरू आहे. रशिया आणि युक्रेनमध्ये युद्ध पेटता क्षणी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तातडीने सूचना देत परराष्ट्र खात्यातील कर्मचाऱ्यांना कामाला लावले आणि भारतीय विद्यार्थी आणि विद्यार्थिनींना सुखरूप मायदेशी परत आणण्यासाठी सर्वंकष योजना आखली. ऑपरेशन गंगा असे या मोहिमेचे सार्थ नाव आहे. मुंबई, पुणे, परभणी, नागपूर अशा महाराष्ट्रातील अनेक शहरांमध्ये हे विद्यार्थी घरी पोहचले आहेत. आकडेवारीनुसार रायगड जिल्ह्यातील सुमारे २६ विद्यार्थी युक्रेनमध्ये अडकल्याचे दिसत होते. तेथे अडकलेल्या साऱ्याच विद्यार्थ्यांकरिता गेले तीन-चार दिवस एखाद्या दु:स्वप्नासारखे गेले असावेत. आजही किमान १७ हजार भारतीय विद्यार्थी आणि विद्यार्थिनी कीव्ह आणि खार्कीव्हमध्ये अडकून पडले आहेत, असे सांगितले जाते. त्यांची सुटका करण्यासाठी ऑपरेशन गंगा या मोहिमेचा वेग वाढवण्याचे आदेश पंतप्रधान मोदी यांनी दिले असून केंद्र सरकारमधील चार महत्त्वाचे मंत्री स्वत: युद्धभूमीकडे रवाना होणार आहेत. ज्योतिरादित्य शिंदे, किरण रिजिजू, हरदीपसिंग पुरी आणि व्ही. के. सिंग हे चारही केंद्रीय मंत्री युद्धभूमीवर अडकून पडलेल्या भारतीयांना तातडीने परत आणण्यासाठी रवाना होत आहेत. पोलंड, बेलारूस, रोमेनिया या युक्रेनच्या शेजारी देशांमध्ये सरहद्दीनजीक तळ ठोकून भारतीय नागरिकांची सुटका करण्याची कामगिरी त्यांना पार पाडावी लागणार आहे. भारताच्या इतिहासात पहिल्यांदाच असे सक्रीय सरकार लोकांना पहायला मिळाले असेल. यापूर्वी कधीही स्वत: केंद्रीय मंत्री स्वत:च्या नागरिकांना वाचवण्यासाठी युद्धभूमीकडे गेल्याचे उदाहरण नाही. युक्रेनमध्ये अडकून पडलेल्या चिनी विद्यार्थ्यांनीदेखील भारतीय अधिकाऱ्यांकडे आम्हाला इथून सोडवा, अशी विनंती केल्याची दृश्ये वृत्तवाहिन्यांनी दाखवली. याचा अर्थ आपल्या नागरिकांना वाचवण्यासाठी अन्य देश भारताइतका जीव पाखडत नाहीत असाच होतो. बदललेल्या भारताचे हे रूप म्हणावे लागेल. उरलेला विद्यार्थीवर्गदेखील लवकरच ऑपरेशन गंगा मोहिमेमार्फत सुखरूप मायदेशी पोहचेल यात शंका नाही.**

# महाड पालिका निवडणुकीचे पडघम वाजू लागले!

विकासाचा विचार घेऊन महाड नगरपालिकेतील मतदारांनी वेळोवेळी मतदान केले आहे. शिवसेनेचा आणि राष्ट्रवादीचा एक अपवाद वगळता महाड नगरपालिकेत महाडचे शिल्पकार कै. अण्णासाहेब सावंत व त्यानंतर काँग्रेसचे माजी आमदार कै. माणिकराव जगताप यांचीच एकहाती सत्ता राहिली आहे. सध्या महाड नगरपालिकेची मुदत संपली असून प्रशासकाची नियुक्ती झाली आहे. बहुदा येत्या एप्रिलमध्ये महाड नगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक होण्याची शक्यता आहे.



मावळत्या नगरपालिकेत कै. माणिकराव जगताप यांची कन्या स्नेहल जगताप यांनी त्यांचा कार्यकाल पूर्ण केला आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमधील नगराध्यक्ष, सरपंच हे थेट जनतेने निवडून द्यायचे, हा निर्णय भाजपच्या तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतला होता. या निर्णयामुळे नगराध्यक्ष आणि सरपंच निवडीच्या प्रक्रियेतला घोडेबाजार बंद झाला होता. जो योग्य आणि गुणवंत असेल तोच हे पद सांभाळू शकेल, तसेच जनतेने निवडून दिलेला असल्याकारणाने अविश्वास आणण्याचा प्रश्नच नाही. त्यामुळे या स्थानिक संस्थांचा कारभार सुरळीत चालण्यास मदत झाली होती. भ्रष्टाचारदेखील कमी झाला होता, मात्र आघाडी सरकारने हा निर्णय रद्द ठरविल्याने नगराध्यक्षांची निवड आता थेट जनतेतून होणार नाही, तर ती निवडून आलेल्या नगरसेवकांमधून होणार आहे. या वर्षी प्रभाग रचनेतही बदल झाला असून महाड नगरपालिकेची सभासद संख्या १७ वरुन २० झाली आहे. प्रभाग रचना बदलल्यामुळे प्रस्थापित नगरसेवकांचे मनसुबे धुळीत मिळणार आहेत.

महाड नगरीचे शिल्पकार कै. अण्णासाहेब सावंत यांनी नगरपालिकेला विकासाचा चेहरा दिला. 'क' वर्ग नगरपालिका असूनही तीस वर्षांपूर्वी सावंतांच्या काळात शहरातील सर्व रस्ते उच्च दर्जाचे, काँक्रिट होते. सुलभ गटार व्यवस्था, कोथुर्डे पाणी योजनेचा विस्तार, अतिरिक्त एमआडीसी, लाडवली पाणी योजना, ऐतिहासिक चवदार तळे सुशोभीकरण आणि सर्वात महत्वाचे म्हणजे एकही रुपयाचा भ्रष्टाचार नाही. अशा अनेक



## खबरबात
**महेश शिंदे**



कारणांमुळे कै. अण्णासाहेब सावंत यांना महाड शहराचे शिल्पकार संबोधले जाते. ३५ कोटींचे बजेट असलेल्या महाड नगरपालिकेत तत्कलीन मंत्री प्रभाकर मोरे यांचादेखील विकासामध्ये वाटा आहे. सावंतांनंतर या नगरपालिकेची धुरा (कै.) माणिकराव जगताप यांनी आपल्या खांद्यावर घेतली. भाजपचे देवेंद्र फडणवीस यांच्याबरोबर असलेल्या मैत्रीचा त्यांनी विकास निधी आणण्यात चांगला उपयोग करून घेतला.

छत्रपती शिवाजी महाराज चौकात वाहतूक बेट निर्मिती करुन शिवरायांचा अश्वारूढ पुतळा उभारण्यात आला. नगरपालिका शाळा इमारतीची निर्मिती, गटारांचे रुंदीकरण आणि सर्वात महत्वाचे म्हणजे नगरपालिकेची नवीन प्रशासकीय इमारत उभारण्यात आली. २२ जुलैच्या महापुरात जेव्हा सर्व शासकीय कार्यालये पाण्याखाली गेली होती, तेव्हा याच इमारतीचा महाड बचाव व मदतकार्यासाठी शासकीय कार्यालयांना आधार मिळाला होता.

महाड नगरपालिकेच्या २०१७च्या निवडणुकीत माणिकरावांनी आपली मुलगी स्नेहल जगताप यांना थेट जनतेतून नगराध्यक्ष म्हणून निवडून आणून एक हातीसत्ता कायम ठेवली, मात्र कोरोने त्यांच्यावर डाव टाकला आणि जेव्हा महाड महापुरात बुडाले होते अशा संकटाच्या काळात माणिराव हे जग सोडून गेले. त्यानंतर आघाडी सरकारकडून महाडकरांची उपेक्षा झाली. महापुरानंतर भाजपकडून जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली महाडकरांना मदतीचा हात देण्यात आला. त्यांनी नागरिकांना मोठा आधार दिला.

मध्यंतरीच्या काळातील शिवसेनेची सत्ता आणि काही काळासाठी राष्ट्रवादीचा नगराध्यक्ष वगळता महाड नगरपालिकेत माणिकरावांची एकहाती सत्ता होती. एकेकाळी नगरपालिकेच्या सभागृहात भाजपचे दोन नगरसेवक होते. २०१७च्या निवडणुकीत शिवसेनेचे १७ पैकी पाच नगसेवक निवडून आले होते आणि त्यावरच त्यांना समाधान मानावे लागले होते.

एप्रिल २०२२मध्ये महाड नगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक होण्याची शक्यता आहे. राज्यात जरी महाविकास आघाडी सरकारमध्ये शिवसेना, काँग्रेस आणि राष्ट्रवादी एकत्र असले तरी महाड नगरपालिका निवडणूक हे तिनही पक्ष स्वतंत्रपणे लढवण्याची शक्यता आहे. या तीन पक्षांसोबतच भाजप आणि मनसेदेखील रिंगणात असणार आहे. मुंबई महानगरपालिका निवडणुकीत जर भाजप, मनसे युती झाली, तर ती युती महाडमध्येदेखील होऊ शकते आणि त्याचा चांगला निकाल येऊ शकतो तसेच शिवसेनेला शह देण्यासाठी आणि राष्ट्रवादीला रोखण्यासाठी काँग्रेस पक्ष या वेळी भाजपसोबत युती करू शकतो व तसे झाल्यास जगतापांची सहानुभूती आणि भाजपचे हिंदूत्व ही ताकद दोघांना पुन्हा सत्ता मिळवून देऊ शकते. खासदार सुनील तटकरे यांची खेळी महाड नगरपालिकेचे चित्र बदलू शकते असा काही जणांचा अंदाज आहे, तर आमदारकी माझी आणि नगरपालिका तुमची या बोलीवर काँग्रेस आणि शिवसेनेची अंतर्गत छुपी युती होऊ शकते. २० नगरसेवक असलेल्या आणि ३५ कोटींचे बजेट असणारी ही नगरपालिका आपल्याकडे ठेवण्यात शिवसेना आणि काँग्रेस यांच्यात खरी लढत असली तरी भाजपचा प्रभाव हा या दोघांच्याही मान्य करावा लागत आहे. मनसेलाही आपल अस्तित्व टिकविण्यासाठी भाजपाशिवाय पर्याय दिसत नाही. पुढे काय होते हे पाहण्यासाठी प्रतीक्षा करावी लागणार आहे.

# मराठी भाषेचा आदर करा -सचिन मयेकर



(छाया : विजय मांडे)

**कर्जत : प्रतिनिधी**

सध्याच्या काळात इंग्रजीची गरज आहे, मात्र आपल्या मायबोलीला दुर्लक्षित करून चालणार नाही. आपल्या मराठी भाषेचा आपण कायम आदर ठेवला पाहिजे. आपली मुले इंग्रजी शाळेत शिकत असली तरी घरी शक्यतो मराठी भाषेचा वापर करा, असे आवाहन राज्य परिवहन महांडळाचे रायगड विभागीय भांडार अधिकारी सचिन मयेकर यांनी कर्जत येथे रविवारी (दि. २७) व्यक्त केले.

परिवहन महामंडळाच्या (एसटी) कर्जत आगाराच्या वतीने रविवारी मराठी राजभाषा दिनाचे आयोजन करण्यात आले होते. ज्येष्ठ पत्रकार विजय मांडे यांच्या हस्ते कुसुमाग्रजांच्या प्रतिमेला पुष्पमाला अर्पण करून समारंभाचे उद्घाटन करण्यात आले. वाहतूक नियंत्रक वसंत बागुल यांनी उपस्थितांचे स्वागत केले. दीपक देशमुख यांनी प्रास्ताविकात कार्यक्रमाचा उद्देश सांगितला.

स्पर्धेच्या युगात इंग्रजी भाषा शिकणे आवश्यक असले तरीही आपल्या मराठी भाषेला विसरता कामा नये. आपण सर्व ठिकाणी मराठी भाषेतच बोलले पाहिजे, असे मत विजय मांडे यांनी या वेळी व्यक्त केले.

वाहतूक निरीक्षक हरेश पालकर, सहाय्यक वाहतूक निरीक्षक देवानंद मोरे, महादेव पालवे यांच्यासह आगारातील कर्मचारी व प्रवासी या वेळी उपस्थित होते.



(छाया : संतोष पेरणे)

# कर्जतमध्ये साखळी पुस्तक योजना

**कर्जत : बातमीदार**

मराठी भाषा दिनाच्या निमित्ताने श्री लक्ष्मीकांत सार्वजनिक वाचनालय व ग्रंथसंग्रहालय आणि विश्व हिंदू परिषद कर्जत प्रखंड यांच्या संयुक्त प्रयत्नाने रविवारी तालुक्यातील १६ आदिवासी पाड्यांवर हुतात्मा नाग्यादादा कातकरी साखळी पुस्तक योजना सुरू करण्यात आली असून पुस्तकांच्या एका संचाचे वाचन झाल्यानंतर दुसरा संच आयोजक देणार आहेत.

वाडी-वस्तीत राहणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी या हेतूने सुरु करण्यात आलेल्या या योजनेचा शुभारंभ मराठी राजभाषा दिनाचे औचित्य साधून रविवारी कर्जत तालुक्यातील पळसदरी, भिसेगाव, बामणोली आणि नांगुर्ले येथील वनवासी वाड्यांमध्ये करण्यात आला. या वेळी २५ छोट्या पुस्तकांचा संच प्रत्येक वाडीवर एका स्वयंसेवकाकडे ठेवण्यात आला. या संचातील पुस्तके वाचून पूर्ण झाल्यानंतर हा संच बदलून दुसरा संच दिला जाणार आहे. ही साखळी पुस्तक योजना सुरवातीला कर्जत तालुक्यातील १६ वाड्यांवर सुरू करण्यात येत आहे.

लक्ष्मीकांत वाचनालयाचे कार्याध्यक्ष पद्माकर गांगल, सचिव सूचिता जोगळेकर, ग्रंथपाल रामदास गायकवाड, गावच्या पोलीस पाटील विनया खोपकर, जिल्हा बजरंग दल संयोजक साईनाथ श्रीखंडे, प्रखंड मंत्री विशाल जोशी, सचिन ठाकूर, सामाजिक कार्यकर्ते महेंद्र निगुडकर, वसंत महाडिक, गाजनन पवार, अंकुश दरेकर, घाडगे यांच्यासह ग्रामस्थ या वेळी उपस्थित होते.

## आरोग्य प्रहर

# आहारात कमी कॅलरीज घ्या अन् दीर्घायुषी व्हा!

ओट्समध्ये प्रथिने आणि फायबरचे प्रमाण जास्त असते. फायबर पचायला वेळ लागतो. त्यामुळे पोट बराच काळ भरलेले राहते. आपण रोजच्या जीवनात कुठला आहार घेतो याला अत्यंत महत्व असते. आपला आहारविहारच आपल्या निरोगी जीवनशैलीचे प्रतीक असते. त्यामुळे आपल्या आहाराला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. असे म्हटले जाते की, पूर्वी अन्नात भेसळ नसल्याने लोकांचे आयुर्मानदेखील वाढते होते. पूर्वी सहज पध्दतीने लोक वयाची शंभरी पार करीत होते. त्यांच्या खानपान पध्दतीदेखील चांगल्या होत्या. नुकत्याच झालेल्या एका अभ्यासानुसार जे लोक कमी अन्न खातात ते जास्त काळ जगतात असा दावा केला गेला आहे. येल युनिव्हर्सिटीच्या शास्त्रज्ञांचे म्हणणे आहे की कॅलरीजचे सेवन कमी केल्याने तुमची रोगप्रतिकारक शक्ती पुन्हा जिवंत होऊ शकते.

अभ्यासात असे आढळून आले, की जे तरुण १४ टक्के कमी कॅलरी ग्रहन करतात, त्यांची थायमस ग्रंथी अधिक चांगले काम करत होती. थायमस ग्रंथी हृदयाच्या वर असते आणि रोगाशी लढणाऱ्या टी-पेशी निर्माण करते. या ग्रंथीतून 'थायमोसिन' नावाचा हार्मोन स्त्रवतो. थायमस ग्रंथी गायब झाल्यामुळेच मानवामध्ये वृद्धत्व येते. मुलांमध्ये ही ग्रंथी मोठी असते. या संशोधनात सहभागी असलेले आहारतज्ञ विश्वदीप दीक्षित म्हणाले, की दीर्घायुष्यासाठी ही ग्रंथी नष्ट होण्यापासून बचाव केला पाहिजे. संशोधकांचे मत आहे की, कॅलरीज्चे प्रमाण कमी केल्याने शरीरातील जळजळही कमी होऊ शकते.

'सायन्स'मध्ये प्रकाशित झालेल्या या अभ्यासात २६ ते ४७ वयोगटातील २३८ दुबळ्या लोकांचा समावेश होता आणि यापैकी दोन तृतीयांश लोकांना त्यांच्या कॅलरीजचे सेवन कमी करण्यास सांगितले होते. या अभ्यासात सामील असलेल्या लोकांचे दैनंदिन शरीराचे वजनदेखील मोजले गेले. जेव्हा संशोधकांनी दोन वर्षांनंतर या सर्व लोकांचे एमआरआय स्कॅन केले तेव्हा ज्यांनी आपल्या आहारात कमी कॅलरीज घेतल्या आहेत, त्यांच्यामध्ये थायमस ग्रंथी अधिक चांगले काम करत असल्याचे आढळून आले.

संशोधकांनी थायमस ग्रंथीभोवती असलेल्या टी-पेशींची संख्या तसेच चरबीची पातळीदेखील तपासली. संशोधकांना असेही आढळले, की जे लोक आहारात कमी कॅलरी घेतात, त्यांच्या थायमस ग्रंथीभोवती चरबीची उपस्थिती सामान्य आहार घेणाऱ्यांच्या तुलनेत कमी असल्याचे आढळून आले. ज्येष्ठ लेखक व येल सेंटर फॉर रिसर्च ऑन एजिंगचे संचालक प्रा. दीक्षित म्हणाले की, दोन वर्षांपासून कमी कॅलरी घेणार्या लोकांमध्ये टी-सेलची निर्मिती अधिक होत असते. त्यामुळे मानवी आयुर्मान वाढत असल्याचा दावा त्यांनी केला आहे.

# रोह्यात कवी कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेचे पूजन

**रोहे : प्रतिनिधी**

मराठी राजभाषा दिनानिमित्त रोहा एसटी स्थानकात रविवारी पत्रकार महादेव सरसंबे यांच्या हस्ते कविवर्य कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कर्मचाऱ्यांनी बसस्थानकात सुंदर रांगोळ्या काढल्या होत्या. या वेळी उत्साही वातावरणात मराठी राजभाषा दिन साजरा करण्यात आला.

आगर प्रमुख प्रियंका कांबळे, वाहतूक नियंत्रक पंढरीनाथ गडेकर, नेमू गावीत, संतोष गायकवाड, शंकर खानापुरकर, लेखनिक माधव पाटील, सागर गाणे, वैभव नाईक, वाहन परीक्षक गणेश महाडीक, पत्रकार विश्वजीत लुमन, निलेश ठमके यांच्यासह एसटी कर्मचारी व प्रवासी यावेळी उपस्थित होते.



(छाया : महादेव सरसंबे)

# मुरुडमध्ये ऑनलाइन प्रश्नमंजुषा स्पर्धा



(छाया : संजय करडे)

**मुरुड : प्रतिनिधी**

मराठी आपल्या संस्कारांची भाषा आहे. ग्लोबल युगात मराठी भाषेचा अधिकाधिक प्रसार होण्यासाठी मराठी माणसाने पुढाकार घ्यावा, असे आवाहन मुरुड येथील वसंतराव नाईक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विश्वास चव्हाण यांनी येथे केले.

मराठी राजभाषा दिनानिमित्त वसंतराव नाईक महाविद्यालयात आयोजित केलेल्या कार्यक्रमात प्राचार्य डॉ. विश्वास चव्हाण बोलत होते. मराठी आपल्या संस्कारांची भाषा आहे, याचा सार्थ अभिमान आपल्याला असला पाहिजे, असे त्यांनी यावेळी सांगितले.

डॉ. मधुकर वेदपाठक यांनी दीपप्रज्वल केले. डॉ. प्राचार्य डॉ. विश्वास चव्हाण यांच्या हस्ते कुसुमाग्रजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

महाविद्यालयाचे मराठी विभाग प्रमुख डॉ. श्रीशैल भैरगुंडे यांनी प्रास्ताविक केले. मराठी राजभाषा दिनाचे औचित्य साधून या वेळी विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन प्रश्न मंजुषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. ग्रंथपाल गजानन मुनेश्वर, डॉ. मधुकर वेदपाठक, डॉ. मुरलीधर गायकवाड, डॉ. देविदास रौदळ, डॉ. सीमा नाहिद यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.

# पेण अर्बन बँकेची मालमत्ता शिशिर धारकरांची प्रॉपर्टी नाही!

## संघर्ष समिती कार्याध्यक्ष नरेन जाधव यांचा हल्लाबोल


(छाया : अनिस मनियार)

**पेण : प्रतिनिधी**

बँकेची मालमत्ता विकून ठेवीदारांना येत्या दोन वर्षात पैसे परत देण्याची वल्गना शिशिर धारकर करीत आहेत, मात्र पेण को-ऑपरेटिव्ह अर्बन बँकेची मालमत्ता ही त्यांची वडिलोपार्जित प्रॉपर्टी नाही, असा हल्लाबोल संघर्ष समितीचे कार्याध्यक्ष नरेंन जाधव यांनी पेणमध्ये घेतलेल्या पत्रकार परिषदेत केला.

संघर्ष समितीने सलग ११ वर्ष उपोषणे, आंदोलने, निदर्शने व न्यायालयात दाद मागून ठेवीदारांचे पैसे मिळविण्यासाठी लढा दिला आहे. न्यायालयात संघर्ष समितीने वेळोवेळी सत्य समोर आणून ठेवीदारांच्या कष्टाच्या पैशावर डल्ला मारणाऱ्यांना विरोध करून बँकेमध्ये असलेल्या ठेवीदारांच्या पैशाने विकत घेतलेल्या मालमत्तेवर बँकेचे नाव चढवून घेतल्यानेच आज सदरची मालमत्ता बँकेच्या नावे आहे. ती मालमत्ता विकण्याचा अधिकार शिशिर धारकर यांना नाही. त्यामुळे होऊ घातलेल्या पेण नगर परिषदेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदारांना व ठेवीदारांना भूलथापा देऊन आपला राजकीय स्वार्थ साधण्याचा शिशिर धारकर यांचा डाव जनता हाणून पाडेल, अशा विश्वास नरेन जाधव यांनी या वेळी व्यक्त केला.

पेण अर्बन बँक घोटाळा २०१० रोजी उघडकीस आला. त्यावेळी तत्कालीन सहकार मंत्र्यांना शिशिर धारकर यांनी आपण दर महिन्यात ४० कोटी बँकेत भरणा करू असे लेखी पत्र दिले होते. तसेच त्यावेळी विविध वृत्तपत्रांमध्ये जाहिरात देऊन दर महिना ५० कोटींची कर्ज वसुली करून देण्याचे जाहीर कबूल केले होते. त्यावेळीही शिशिर धारकर खोटे बोलले होते आणि आजही ते खोटे बोलत आहेत. त्यांनी आजपर्यंत बँकेत किती पैसे वसूल करून भरले असा सवालही नरेन जाधव यांनी या वेळी केला.

ते पुढे म्हणाले की, पेण को-ऑपरेटिव्ह अर्बन बँकेमध्ये २००१ पासून घोटाळे सुरू होते. २०१० पर्यंत १८९ विनातारण, विना कागदपत्रे कर्ज देण्यात आली होती. सदर प्रकरणांमधून २६३५ कोटीहून अधिक रक्कम कर्ज म्हणून वाटप करण्यात आल्याचे दाखविण्यात आले होते. या काळात शिशिर धारकर हे बँकेचे अध्यक्ष, तज्ज्ञ संचालक, संचालक पद भुषविली आहेत. आज ते बँकेतील घोटाळ्या संदर्भात आपल्याला काहीच माहिती नव्हती असा बनाव करीत आहेत.

शिशिर धारकर यांनी सहा कंपन्या बनवून मेटल स्क्रॅप ट्रेडिंग कॉर्पोरेशनकडून ४८० कोटी रुपये कर्ज घेतले होते. हे कर्ज १७० दिवसात फेडायचे असते. परंतु ते कर्ज न फेडल्याने सीबीआय चौकशी झाली व बँकेचा घोटाळा समोर आला. या घोटाळ्यात मेटल स्क्रॅप ट्रेडिंग कॉर्पोरेशनचे अधिकारी व रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे अधिकारी देखील सामील होते. त्यांना कोर्टात आरोपी करण्यात आले आहे, असेही जाधव म्हणाले.

शिशिर धारकर यांच्या कारकिर्दीत बँकेने धारकर यांच्याकडे कामाला असलेल्या समीरा शेख व त्यांच्या नातेवाईकांना सुमारे ५० कोटींचे विनातारण कर्ज दिले. त्याचप्रमाणे अशोक शहा व कुटुंबीय तसेच शैलेश देशपांडे यांच्या नावे कर्ज व जमीनाची अशी अनेक प्रकरणे बनवून ३४२ कोटींची विनातारण कर्ज दिले. या रकमेपैकी केवळ ४० कोटींची मालमत्ता खरेदी करण्यात आली व उर्वरित ३०० कोटींचे काय झाले ? ठेवीदारांच्या कष्टाची रक्कम कुठे गेली ? असा सवाल या वेळी जाधव यांनी केला.

संघर्ष समितीच्या न्यायालयीन लढाईला मुंबई उच्च न्यायालयात २०१६ साली यश आले. मुंबई उच्च न्यायालयाने २०१६ साली बँकेची मालमत्ता विकून ठेवीदारांचे पैसे परत करण्याचा निर्णय दिला होता. या निर्णयाविरोधात एन्फॉर्समेंत डायरेक्टरेट (ईडी) ने सुप्रीम कोर्टात स्टे घेतला आहे. संघर्ष समिती ठेवीदारांच्या वतीने सुप्रीम कोर्टातही बाजू मांडणार आहे. ईडीचा व बँक बुडव्यांचा बँकेच्या मालमत्तेचेवर डोळा आहे. परंतु संघर्ष समिती ठेवीदारांचे कष्टाचे पैसे ठेवीदारांना परत मिळेपर्यंत संघर्ष सुरू ठेवणार असल्याचा दावा नरेन जाधव यांनी पत्रकार परिषदेत केला.

संघर्ष समितीचे जगदिश पेरवी, सुनील देशमुख, गजानन गायकवाड, हरिभाऊ कदम, विभावरी भावे, सुरेंद्र जाधव, नामदेव कासार, दिलीप दुबे व सुरेश वैद्य आदी या पत्रकार परिषदेला उपस्थित होते.

## पनवेल-कर्जत रेल्वेमार्गाच्या दुपदरीकरण कामाला वेग

### *नवीन मार्गिकेचे काम २०२४मध्ये करण्याचे उद्दिष्ट*

**कर्जत : बातमीदार**

पनवेल-कर्जत या २९ किलोमीटर लांबीच्या रेल्वे मार्गावर दुसरी मार्गिका टाकण्याचे काम मध्य रेल्वेकडून सुरु आहे. हे दुहेरीकरणाचे काम २०२४मध्ये पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. त्यामुळे २०२४पासून या रेल्वे मार्गावर उपनगरीय प्रवासी सेवा सुरु होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

कर्जत-पनवेल या रेल्वे प्रकल्पाची सुरुवात कोकण रेल्वे बरोबरच पनवेल येथून झाली होती. २००४ मध्ये हा एकेरी रेल्वे मार्ग प्रवासासाठी तयार झाला. मात्र या मार्गावरील वावर्ले-हालिवली या बोगद्यातील मार्गावर कायम दगड कोसळत होते. त्यामुळे रेल्वे मार्गावर उपनगरीय सेवा सुरु होत नव्हती. शेवटी रेल्वे प्रशासनाने मालवाहू गाडी सुरु केली. २००७ मध्ये या रेल्वे मार्गावर नाशिक-पुणे अशी शटल सेवा सुरु झाली. आज अनेक लांब पल्ल्याच्या प्रवासी गाड्या पनवेल-कर्जत मार्गावर धावत आहेत. मात्र उपनगरीय लोकल सुरु झाली नाही.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि महानगर लक्षात घेऊन कर्जत-पनवेल एकेरी रेल्वे मार्गावर दुसरी मार्गिका टाकण्याचे काम ट्रान्सहार्बर रेल्वे कॉर्पोरेशनकडून सुरु झाले आहे. जुन्या एकेरी मार्गावर ज्या ठिकाणी उपनगरीय रेल्वेसाठी अडथळे निर्माण होत आहेत, त्या ठिकाणी नवीन मार्ग थोडा वळविण्यात आला आहे. वावर्ले येथील हा मार्ग कर्जतकडे येताना डाव्या बाजूने वळविला आहे. त्यामुळे बोगद्यातील दगड पडण्याच्या घटना नवीन एकेरी मार्गावर उद्भवणार नाहीत, असे रेल्वेच्या अभियंत्यांचे मत आहे.

पनवेल-कर्जत रेल्वेमार्गाच्या दुहेरीकरणाचे काम २०२४मध्ये पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. हे काम लवकरात लवकर पूर्ण व्हावे आणि या मार्गावर उपनगरीय सेवा, शटल सेवा सुरु व्हावी अशी प्रवाशांची मागणी आहे.


(छाया : संतोष पेरणे)

## कोकण रेल्वेत प्रवाशाचा मोबाइल चोरला

**माणगाव : प्रतिनिधी**

कोकण रेल्वेतून प्रवास करणाऱ्या हृतिक काशिनाथ कांबळे (वय २२, रा. नालासोपारा, जि.पालघर, मूळ रा.नीलवणे, जि.रत्नागिरी) यांचा १४ हजार रुपये किंमतीचा मोबाइल अज्ञात चोरट्यांनी लांबविला. ही घटना रविवारी (दि.२७) सकाळी १०.३२ वाजण्याच्या सुमारास घडली. याप्रकरणी माणगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


**NEW HORIZON PUBLIC SCHOOL**
Sector-13, Khanda Colony, New Panvel (W), Navi Mumbai -410206

INVITES APPLICATION FOR THE FOLLOWING POSTS

**Principal :** Post Graduate with B.Ed / M.Ed, 15 years of teaching experience & 5 years work experience as a Principal / Vice Principal.

**Vice Principal :** Post Graduate with B.Ed/M.Ed, 10 years of teaching experience & 5 years work experience as a Vice Principal.

**Co-ordinator :** Post Graduate with B.Ed, 8 years of teaching experience & 3 years work experience as a Co-ordinator.

**Pre-Primary Co-ordinator :** Graduate with E.C.C.Ed (min 5 years of experience as a Co-ordinator.)

**PGT :** M.Sc, MA & M.Com with B.Ed.
**Subjects :** English, Maths, Science (Phy, Chem, Bio), Economics, FMM, IP, Accountancy, Business Studies, Computer Science(B.Tech/MCA)

**TGT :** B.Sc, BA with B.Ed.
**Subjects :** English, Hindi, Marathi, Sanskrit, Maths, Science, Social Studies

**PRT :** Graduates with B.Ed / D.Ed.(All subjects)

**Pre-Primary Teacher :** Graduates with ECCEd.

**Physical Ed. Teacher :** B.PEd/M.PEd or equivalent.

**Yoga Instructor :** Suitable qualification.

**Music Teacher :** Instrumental & Vocal.

**Computer/IT Teacher :** BCA/MCA.

**Art/Craft Teacher :** ATD or suitable qualification.

**Special Educator :** Post Graduates / Graduates with B.Ed. (Special Education)

Interested candidates proficient in English, MS Office & Communication Skills with at least 3 years work exp. may apply with a recent passport size photo, CV & a handwritten application to

Contact: +91 9004815857
Email ID: hr.panvel@newhorizonsms.com


## खंडणीप्रकरणी माणगावमध्ये गुन्हा दाखल

**माणगाव : प्रतिनिधी**

मोबाईलवरून तेरे खानदान तो उडा दूंगा अशी धमकी देत पैशांची मागणी केल्याप्रकरणी माणगाव पोलीस ठाण्यात अज्ञात इसमावर गुन्हा दाखल केला आहे.

ग्यानचंद जिऊतबंधन जयस्वाल (वय ४७, रा. माणगाव, मोबाईल नं.९४२०६४८५२८) यांना २५ फेब्रुवारी २०२२ रोजी रात्री ११.४६ वाजण्याच्या सुमारास एका अज्ञात इसमाने मोबाईल (क्र.७२०८५७३१३१) वरून संपर्क केला व 'दो दिन मै तू दो करोड रुपये लेकर सीएसटी स्टेशनपर आना, अगर तू पैसा लेकर नही आया, तो मै तुझे और तेरे फॅमिली को उडा दूंगा. अगर तूने पोलीस को बताया, तो तेरे पुरे खानदान को उडा दूंगा' अशी धमकी दिली.

**MAHATRANSCO**
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E-TENDER NOTICE**

**MSETCL invites E-Tender from registered SRM vendors on Mahatransco Website**

| Sr.No. | Tender No. | Tender Name | Tender Amount | Submission Date |
| --- | --- | --- | --- | --- |
| 1 | E-Tender-7/2021-22 RFx No. 7000022370 | SRM E-Tender for providing daily sweeping / cleaning services at office, godown & store yard area of Major Stores Panvel for the FY 2022-23 | Rs. 3.06 Lakh | 07.03.2022 upto 13:00 Hrs. |
| EMD amount Rs. 5000.00 & Tender fees Rs. 525.00 GST extra for submission of bids. | | | | |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :** EE, Mob No. 9930057633

Sd/-
**EE, MAJOR STORES PANVEL**

**MAHATRANSCO**
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**Extension to E –TENDER NOTICE**

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender specification. Tender fees Rs.500/- + GST**

| Sr. No. | Particulars | Description |
| --- | --- | --- |
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFxNo :- 7000022282** **Tender No. : EE/EHV (O&M)/DN/PNL/e-Tender-63/2021-2022.** Extension to RFx e-tender for work of separation of common jumpers between 100kV Bus and Bus isolators of opposite bays at 100/22kV Taloja Substation under EHV (O&M) Division Panvel. **Tender amount Rs. 1,76,389/-, EMD amount Rs. 25,000/-** |
| 2 | Online Downloading the RFx . | **01.03.2022, 12:00 Hrs. to 08.03.2022, 23:59Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 08.03.2022 up to 23:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the Techno Commercial RFx | **09.03.2022 at 11.00 hrs. (if Possible)** |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The ADDL. Executive Engineer, (O) : Phone No. 022- 2746 5410.
**Note :** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**SD/-**
**(M.C. JOSHI)**
**EXECUTIVE ENGINEER**
**E.H.V. (O&M) DIVN.PANVEL**

**पनवेल महानगरपालिका**
**दिनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान (DAY-NULM)**
**जाहीर नोटीस**

पनवेल महानगरपालिकेव्दारे दिनदयाळ अंत्योदय योजना-राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान अंतर्गत नागरी पथविक्रेत्यांना सहाय्य या उपांगाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी पनवेल महानगरपालिकेकरिता स्वतंत्र फेरीवाला धोरण आदर्श उपविधी २०२२ तयार करण्यात आला आहे. सदर उपविधीला मा. आयुक्त पनवेल महानगरपालिका यांच्या अध्यक्षतेखाली दि.२४/०२/२०२२ रोजी झालेल्या शहर फेरीवाला समितीच्या बैठकीमध्ये सर्वानुमते मान्यता देण्यात आली आहे.

शहर फेरीवाला समितीने सर्वानुमते मंजूर केलेला आदर्श उपविधी २०२२, हरकती सुचनांकरिता प्रसिध्द करण्यात येत आहे. सदर तयार करण्यात आलेला आदर्श उपविधी २०२२ हा पनवेल महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर (www.panvelcorporation.com) प्रसिध्द करण्यात आला आहे. तसेच त्याची एक प्रत मुख्य कार्यालयामध्ये ठेवण्यात आली आहे. तरी,आपल्या काही हरकती सुचना असल्यास दिनांक ०१/०४/२०२२ पर्यंत कार्यालयाकडे सादर कराव्यात जेणेकरून सुधारीत उपविधी करणेकरीता सदर हरकती सुचना विचारात घेतल्या जातील.

नमुद केलेल्या तारखेनंतर आलेल्या हरकती/सुचना विचारात घेतल्या जाणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

*पमपा/DAY-NULM/SUSV*
*2441/135/प्र.क्र.२०/१३५/२०२२*
दिनांक : २८/०२/२०२२

**सही/-**
**(कैलास गावडे),**
उपायुक्त तथा, शहर प्रकल्प अधिकारी,
पनवेल महानगरपालिका

**जाहीर नोटीस**

आमचे अशिल श्रीमती भैरवी प्रवीण वर्मा (पंजाबी), रा. पनवेल, जिल्हा रायगड यांचे तर्फे व वतीने तमाम लोकांस या 'जाहीर नोटीसी'ने कळविण्यात येते की, खालील तक्त्यात नमुद केलेली जमीन मिळकत ही नंदिनीबाई प्रतापसिंह चव्हाण यांचे नावे महसुल दप्तरी सात / बाराच्या उताऱ्यावर दाखल आहे. मिळकतीचे वर्णन येणेप्रमाणे :

**गाव पनवेल, तालुका पनवेल, जिल्हा रायगड**

| अ.क्र. | स.नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे-आर-पॉ. | आकार रु.पै. |
| --- | --- | --- | --- | --- |
| १ | ३२५ | ० पै. | ०-४२-५० | ०८.१९ |

वरील तक्त्यात नमुद केलेल्या जमीन मिळकतीस यापुढे 'सदर जमीन मिळकत' असे संबोधिले आहे.

श्रीमती नंदिनीबाई प्रतापसिंह चव्हाण हीचे निधन झाले असून तिचे पश्चात मुलगे - सुभाष प्रतापसिंह चव्हाण व राजकिरण प्रतापसिंह चव्हाण आणि मुलगी माधवी मधुकर साळुंखे असे कायदेशीर वारसदार होते व आहेत. आणि 'हिंदू वारसा कायद्या'चे तरतुदींप्रमाणे वरील कायदेशीर वारसदार सुभाष प्रतापसिंह चव्हाण व राजकिरण प्रतापसिंह चव्हाण आणि मुलगी माधवी मधुकर साळुखे यांचा सदर जमीन मिळकतीत प्रत्येकी १/३ अविभक्त मालकी हक्क, हिस्सा व हितसंबंध होता व आहे.

वरील कायदेशीर वारसदारांपैकी सुभाष प्रतापसिंह चव्हाण यांचे सन २००५ चे सुमारास निधन झाले आहे. तसेच त्यांची पत्नी सोनल सुभाष चव्हाण हीचेही सन २०१७ साली निधन झाले आहे. सदर सुभाष प्रतापसिंह चव्हाण आणि सोनल सुभाष चव्हाण या दोघांचे पश्चात त्यांना मुलगा - योगेश सुभाष चव्हाण आणि दोन मुली अनुक्रमे रुपाली संजय मुरकुटे व भैरवी प्रवीण वर्मा (पंजाबी) असे कायदेशीर वारसदार होते व आहेत. 'हिंदू वारसा कायद्या'चे तरतुदीप्रमाणे सदर जमीन मिळकतीपैकी सुभाष प्रतापसिंह चव्हाण यांच्या १/३ अविभक्त मालकी हक्क, हिस्सा व हितसंबंधात योगेश सुभाष चव्हाण, रुपाली संजय मुरकटे व भैरवी प्रवाण वर्मा (पंजाबी) यांचा प्रत्येकी १/३ अविभक्त मालकी हक्क, हिस्सा, हितसंबध व अधिकार होता व आहे.

असे असताना आमचे अशिलास खात्रीपूर्वक अशी माहिती मिळाली आहे की, काही त्रयस्थ व्यक्ती, संस्था, इसम वगैरे यांनी आमचे अशिल वगळता वर नमुद केलेल्या इतर कायदेशीर वारसदारांसोबत 'सदर जमीन मिळकती'चे संपूर्ण क्षेत्र आणि अगर अंशत: क्षेत्र विकत घेण्याचा व्यवहार करण्याचा इरादा केला आहे.

वास्तविक पाहता आमचे अशिलाचा 'सदर जमीन मिळकती'त कायदेशीर अविभक्त मालकी हक्क, हिस्सा, हितसंबंध व अधिकार होता व आहे. आणि 'सदर जमीन मिळकती'चे संपूर्ण क्षेत्र आणि अगर अंशत: क्षेत्र सह मालक-हक्क-हिस्सेदार म्हणून आमचे अशिलांना 'प्रथमाधिकारा'ने (राईट ऑफ प्रिएम्पशन) खरेदी करण्याचा कायदेशीर हक्क व अधिकार आमचे अशिलास आहे.

सबब आमचे अशिलास वगळून आणि अगर आमचे अशिलाची लेखी परवानगी घेतल्याशिवाय कोणाही अन्य त्रयस्थ व्यक्ती, संस्था, इसम वगैरे यांना वर नमुद केलेल्या इतर कायदेशीर वारसदारांकडून 'सदर जमीन मिळकती'चे संपूर्ण क्षेत्र आणि अगर अंशतः क्षेत्र खरेदी-विक्री व्यवहार करण्याचा कायदेशीर हक्क व अधिकार नाही.

तसेच आमचे अशिलाने तिचे 'सदर जमीन मिळकती'तील मालकी हक्क, हिस्सा, हितसंबंध व अधिकार कोणासही हस्तांतरीत केलेले नाही अगर त्याबाबत कोणासही अखत्यारपत्रही दिलेले नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

तरी सर्व संबंधितांना या जाहीर नोटीसीने सुचित करण्यात येत आहे की, वर नमुद केलेल्या 'सदर जमीन मिळकती'बाबत कोणाही अन्य त्रयस्थ व्यक्ती, संस्था, इसम वगैरे यांनी आमचे अशिलांना वगळून आणि अगर आमचे अशिलांची लेखी परवानगी घेतल्याशिवाय अन्य कायदेशीर वारसदारांसोबत कोणताही करार, दस्त जसे खरेदीखत, साटेकरार, वचनचिठ्ठी, बयाणा पावती, एम.ओ.यू., भाडेपट्टा, गहाण, दान, बक्षीसपत्र, इच्छापत्र वगैरे अगर अन्य प्रकारे कोणताही कायदेशीर मालकी हक्क-हितसंबंध, ताबेकबजा, वहीवाट वापर वगैरे अधिकार व हक्क निर्माण करु नये, त्यास आमचे अशिलाची सक्त कायदेशीर हरकत आहे, हे कळावे म्हणून ही 'जाहीर नोटीस' प्रसिध्द केली आहे.

आमचे अशिलांना वगळून आणि अगर आमचे अशिलाची लेखी परवानगी न घेता केलेले कोणत्याही स्वरुपाचे व्यवहार आणि त्याबाबतचे करार, दस्त वगैरे हे आमचे अशिलावर बंधनकारक रहाणार नाहीत, याची सर्वांनी नोंद घ्यावी म्हणून ही नोटीस प्रसिध्द केली आहे.

स्थळ : पनवेल.
तारीख : २८/०२/२०२२

**सही/-**
**सलिल शब्दुलरहमान शेख**
(ॲडव्होकेट हायकोर्ट)
१, स्वप्नपूर्ती, १३४१ बी/१, शाह प्लाझाजवळ, प्रभुआळी, पनवेल, जि. रायगड -११०२०६. मो. ९८६९०८७३९९

**महाराष्ट्र जीवन प्राधिकरण**
**ई-निविदा सूचना क्र. ६५ सन २०२१-२२ (दुबार मागणी)**

कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, जलव्यवस्थापन विभाग, पनवेल यांचेकडून खालील कामाकरीता ई-निविदा सुचना मागविण्यात येत आहे.

जवाहरलाल नेहरु बंदराकरीता पाणीपुरवठा योजना ता. उरण, जि. रायगड पुर्ण ठेव - शेवा पंप हाऊस जवळील ४०६ मि.मी. व्यासाची लोखंडी जलवाहीनी पुरवठा करणे व अंथरणे व कार्यान्वीत करणे. कामाची अंदाजित **किंमत रू.१६,९४,५०१/-**

कामासंबंधीचा सविस्तर तपशील दि. २८/०२/२०२२ पासून www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

दिनांक : २२/०२/२०२२

क्र. आरओसी/२०२१-२२/
क्र.५/सी-४७७३

**सही/-**
**(व्ही. के. सुर्यवंशी)**
**कार्यकारी अभियंता**
**म.जी.प्रा.ज.व्य. विभाग**
**नवीन पनवेल**

**सहनिबंधक सहकारी संस्था (सिडको) यांचे कार्यालय**
**शहर व औद्योगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र) मर्यादीत**
बेलापूर रेल्वे स्टेशन कॉम्प्लेक्स, टॉवर नं. ०८, ५वा मजला, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४००६१४
फोन नं. (०२२ ६७१२१०२५/२७५७४५०५) ई-मेल : JTRCIDCOHEAR@gmail.com

जा.क्र.सनि/ससं/सिडको/२६३९/२०२२ | दिनांक :- १६/०२/२०२२

**महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत अधिनियम १९६३ चे कलम ११ (२) व नियम (२) अन्वये**

**जाहीर नोटीस**

चेअरमन/सेक्रेटरी
प्रताप अपार्टमेंट को. ऑप. हौ. सो. लि.
भूखंड क्र. ए ११०, ए ११३ ते ११७,
सेक्टर १५, कोपरखैरणे, नवी मुंबई
} **अर्जदार**

**विरुद्ध**

१) मेसर्स नारायण इंटरप्रायजेस तर्फे प्रो. प्रा.
श्री. मनोज सिंग
ऑफीस नं. ०२/७०२, बालाजी गार्डन सेक्टर ११,
कोपरखैरणे, नवी मुंबई
२) श्री. रामा आगास्कर तर्फे वारस
१) माणिक रामा आगास्कर, सदनिका क्र. डी १०१
२) श्री. शालिक रामा आगास्कर, सदनिका क्र. डी १०३
३) श्रीमती माया रामा आगास्कर, सदनिका क्र. डी १०३
४) वासुदेव रामा आगास्कर, शॉप नं. ०४
५) श्री मदन रामा आगास्कर सदनिका क्र. डी २०१
प्रताप अपार्टमेंट को. ऑप. हौ.सो.लि.
भूखंड क्र. ए ११०, ए ११३ ते ए ११७,
सेक्टर १९, कोपरखैरण, नवी मुंबई
३) श्री राणादेवी माता को. ऑप. हो. सोसा. लि.
भूखंड क्र. ए १०८, ए १११ व ए ११२,
सेक्टर १९, कोपरखैरणे, नवी मुंबई
४) मा. व्यवस्थापक (शहर सेवा) २. साटयो,
सिडको लि, सिडको भवन, पाहिला मजला,
सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई.
} **जाब देणार**

प्रताप अपार्टमेंट को. ऑप. हौ. सो. लि.
भूखंड क्र. ए ११०, ए ११३ ते ए ११७, सेक्टर १९,
कोपरखैरणे, नवी मुबई या संस्थेचा दिनांक १७/०१/२०२२ रोजी
या कार्यालयात प्राप्त झालेला अर्ज

१) अर्जदार यांनी अर्ज व त्यासोबतची आवश्यक ती कागदपत्रे जाब देणार यांना सुनावणीपुर्वी द्यावी.

२) जाब देणार यांनी त्यांच्या बचावासाठी व्यक्तीश: किंवा त्यांच्या वकीलांमार्फत अथवा त्यांच्या अधिकृत प्रतिनिधमार्फत सक्षम प्राधिकारी यांचे कार्यालयात सुनावणीपुर्वी लेखी उत्तर सादर करावे.

३) आपणाकड़न प्राप्त झालेले लेखी उत्तर विचारात घेवून प्रकरणातील सुनावणी **दिनांक ०७/०३/२०२२ रोजी दुपारी ०२:००** वाजता निश्चित करण्यात येत आहे.

४) आपण व्यक्तीशः अथवा यथोचितरित्या नियुक्त केलेल्या प्रतिनिधीमार्फत उत्तर दाखल केले नाही किंवा वरील दिनांकास उपस्थित राहिला नाही, तर प्रकरणाची सुनावणी करण्यात येईल आणि एकतर्फी निर्णय देण्यात येईल.

५) आपणास सुनावणीचे वेळी पूर्वी १० मिनिटे अगोदर प्रवेश दिला जाईल. सुनावणी वेळेनंतर प्रवेश दिला जाणार नाही व सुनावणीस आपण गैरहजर आहात असे गृहीत धरण्यात येईल.

६) सुनावणीच्या वेळी एका पक्षकाराच्यावतीने जास्तीत जास्त दोन व्यक्तीना प्रवेश दिला जाईल.

७) सुनावणीचे वेळी लहान मुलांना सोबत आणु नये, कोणत्याही परिस्थितीत लहान मुलांना प्रवेश दिला जाणार नाही.

८) आपणास जे काही लेखी म्हणणे मांडावयाचे आहे ते आपण पीडीएफ (PDF) फॉर्ममध्ये स्वस्वाक्षरीसह या कार्यालयाचे JTRCIDCOHEAR@gmail.com या इमेलवर सुनावणी दिनांकापूर्वी कमीत कमी एक दिवस अगोदर पाठवावे

९) सुनावणीस येताना प्रत्येक व्यक्तीनी मास्क घालणे बंधनकारक राहील विना मास्क प्रवेश दिला जाणार नाही.

१०) प्रवेशद्वारावर सॅनिटायझर उपलब्ध करुन दिलेले आहे. त्याचा वापर करुन प्रवेश दिला जाईल. तसेच प्रत्येक व्यक्तीच्या शरीराचे तापमान तपासले जाईल, ज्या व्यक्तीचे तापमान नियमित तापमानापेक्षा जास्त असेल त्यांना प्रवेश दिला जाणार नाही.

**सही/-**
**(डॉ. केदारी जाधव)**
सहनिबंधक सहकारी संस्था,
सिडको, नवी मुंबई

**लक्षवेध :-** अर्जदार यांना कळविण्यात येते की, त्यांनी प्रस्तुत नोटीस संबंधिताना बजावून त्याची पोहोच पावती सुनावणीपुवी या कार्यालयास सादर करावी, अर्जदार अथवा जाब देणार यांना नोटीस प्राप्त न झाल्याचे कारण देवन भविष्यात न्यायालयात प्रकरण दाखल केल्यास नोटीस प्राप्त न झाल्याच्या प्रकरणी संबंधित अर्जदार यांना जबाबदार धरण्यात येईल याची कृपया नोद घ्यावी.

# लंकेविरुद्ध टीम इंडियाचा डंका

## ■ तिसऱ्या सामन्यासह ट्वेन्टी-२० मालिकेतही निर्भेळ यश

**धरमशाला : वृत्तसंस्था**

मुंबईकर श्रेयस अय्यरच्या सलग तिसऱ्या नाबाद अर्धशतकाच्या बळावर भारताने तिसऱ्या ट्वेन्टी-२० सामन्यात पाहुण्या श्रीलंकेवर सहा गडी आणि १९ चेंडू राखून मात केली. या विजयासह भारताने तीन सामन्यांच्या या मालिकेत ३-० असे निर्भेळ यश संपादले. याआधी वनडे मालिकेतही भारताने लंकेला धूळ चारली होती.



धरमशाला येथे झालेल्या तिसऱ्या टी-२० सामन्यात श्रीलंकेने दिलेले १४७ धावांचे आव्हान भारताने १६.५ षटकांत पूर्ण करीत ट्वेन्टी-२० क्रिकेटमधील सलग १२व्या विजयाची नोंद केली. रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली निर्भेळ यशासह ट्वेन्टी-२० मालिका जिंकण्याची ही भारताची सलग तिसरी वेळ ठरली. त्यांनी याआधी घरच्या मैदानावरच न्यूझीलंड आणि वेस्ट इंडिज या संघांना ट्वेन्टी-२० मालिकेत प्रत्येकी ३-० अशी मात दिली होती.

श्रीलंकेने प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत ५ बाद १४६ अशी धावसंख्या उभारली. त्यांच्या डावाची खराब सुरुवात झाली. मोहम्मद सिराजने पहिल्याच षटकात दनुष्का गुणथिलकाला (०) माघारी पाठवले, तर युवा वेगवान गोलंदाज आवेश खानने या सामन्यात मिळालेल्या संधीचे सोने करताना पथुम निसंका (१) आणि चरिथ असलंकाला (४) झटपट पॅव्हेलियनचा रस्ता दाखवला. त्यानंतर लेग-स्पिनर रवी बिश्नोईने जनिथ लियांगेला (९) बाद केल्याने श्रीलंकेची ४ बाद २९ अशी स्थिती झाली, मात्र कर्णधार दसुन शनकाने ३८ चेंडूंत नाबाद ७४ धावांची खेळी करीत श्रीलंकेला सावरले. त्याला आधी दिनेश चंडिमल (२२) आणि मग चमिका करूणारत्ने (नाबाद १२) यांची साथ लाभल्याने श्रीलंकेने सन्मानजनक धावसंख्या केली.

१४७ धावांचा पाठलाग करताना रोहित (५) आणि इशान किशनच्या अनुपस्थितीत सलामीला आलेल्या संजू सॅमसनला (१८) खेळपट्टीवर फार काळ टिकता आले नाही, परंतु श्रेयसने कामगिरीत सातत्य राखताना मालिकेतील सलग तिसरे अर्धशतक झळकावले. त्याने ४८ चेंडूंत नऊ चौकार आणि एका षटकाराच्या साहाय्याने नाबाद ७३ धावांची खेळी करीत ट्वेन्टी-२० संघातील स्थानासाठी आपली दावेदारी अधिक भक्कम केली. तो तिन्ही सामन्यांत नाबाद राहिला. त्याने दीपक हुडा (२१) आणि रवींद्र जडेजा (नाबाद २२) यांच्या साथीने भारताचा विजय सुनिश्चित केला.

**संक्षिप्त धावफलक**

श्रीलंका : २० षटकांत ५ बाद १४६ (दसुन शनका नाबाद ७४, दिनेश चंडिमल २२; आवेश खान २/२३, मोहम्मद सिराज १/२२) पराभूत वि. भारत : १६.५ षटकांत ४ बाद १४८ (श्रेयस अय्यर नाबाद ७३, रवींद्र जडेजा नाबाद २२; लाहिरू कुमारा २/३९), सामनावीर-मालिकावीर : श्रेयस अय्यर.



# खारघरमध्ये नगरसेविका चषक क्रिकेट स्पर्धा रंगली

## मुरबी स्पोर्ट्स संघाला विजेतेपद

**खारघर : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या खारघरमधील नगरसेविका नेत्रा किरण पाटील यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून खारघर स्पोर्ट्स अकॅडमीच्या वतीने सेंट्रल पार्क मेट्रो स्टेशनजवळच्या मैदानावर टेनिस क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत मुरबी स्पोर्ट्स संघाने विजेतेपद पटकाविले. गोल्डन ईगल अ संघ उपविजेता ठरला.

स्पर्धेत एकूण आठ संघांनी सहभाग नोंदवला होता. या क्रिकेट स्पर्धेला महापौर डॉ. कविता चौतमोल, नगरसेवक प्रवीण पाटील, भाजप खारघर तळोजा मंडल अध्यक्ष ब्रिजेश पटेल, उपाध्यक्ष दिलीप जाधव, भरत कोंडाळकर, अर्चना बागल, मंजू चोप्रा, दीपा पिल्लाई यांच्यासह इतर पदाधिकारी व क्रिकेटप्रेमी उपस्थित होते.

पारितोषिक वितरण समारंभात नगरसेविका नेत्रा पाटील यांनी उपस्थित सर्व खेळाडूंचे अभिनंदन केले व मैदानी खेळ खेळून तंदुरुस्त होऊया, असा संदेश दिला. खारघर स्पोर्ट्स अकॅडमीचे अध्यक्ष किरण पाटील यांनी उपस्थितांचे आभार मानले व दरवर्षी टेनिस क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करूया, असे आश्वासित केले.

स्पर्धा यशस्वी करण्यासाठी पनवेल टेनिस क्रिकेट असोसिएशनचे संदीप पाटील खारघर स्पोर्ट्स अकॅडमीचे गिरीश केणी, सुमित गायकवाड, गोपाल राजपूत, आदित्य हाटगे यांनी मेहनत घेतली.






**उलवे नोड : फ्युचर चॅम्पियन अकॅडमीच्या वतीने तिसरी ओपन स्पीड रोलर स्केटिंग चॅम्पियनशीप २०२२ ही रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स येथे रविवारी आयोजित करण्यात आली होती. प्रशिक्षक संतोष परमेश्वर यांच्या नियोजनाखाली झालेल्या या स्पर्धेत १०० स्पर्धकांनी सहभाग नोंदविला. या वेळी व्यवस्थापक श्यामनाथ पुंडे, संचालक शिवशंकर सुमन, मनोज वास्कर, लोकेश शेट्टीगार यांच्यासह सहाय्यक प्रशिक्षक, पालक उपस्थित होते.** (छाया : लक्ष्मण ठाकूर)

# मयंक अग्रवाल पंजाब किंग्जचा नवा कर्णधार

**चंदिगड : वृत्तसंस्था**

आयपीएल संघ पंजाब किंग्जने मयंक अग्रवालला आपला नवा कर्णधार म्हणून नियुक्त केले आहे. मयंकच्या नेतृत्वाखाली पंजाबचा संघ आयपीएल २०२२ मध्ये खेळणार आहे. मयंकच्या आधी लोकेश राहुल या संघाचा कर्णधार होता. अग्रवालने यापूर्वी कोणत्याही आयपीएल संघाचे नेतृत्व केलेले नाही, मात्र या मोसमात तो आधीच कर्णधार मानला जात होता.

मेगा लिलावापूर्वी पंजाब संघाने केवळ दोन खेळाडूंना कायम ठेवले होते. त्यापैकी मयंक अग्रवाल हा पहिला खेळाडू होताा.



पंजाब किंग्ज संघाने त्यांच्या सोशल मीडिया हँडलवर नवीन कर्णधाराची घोषणा केली आहे. संघाचा कर्णधार बनल्यावर अग्रवाल म्हणाला, आयपीएल २०२२मध्ये पंजाब किंग्जचे कर्णधारपद मिळाल्याने खूप आनंद होत आहे. या वेळी मी पंजाबसाठी विजेतेपद मिळवण्याचा प्रयत्न करेन.



**नवीन पनवेल : के. आ. बांठिया विद्यालयाजवळ असलेल्या मैदानात आई माऊली चषक २०२२ क्रिकेट स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेला पनवेल महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांनी रविवारी भेट देऊन खेळाडूंना शुभेच्छा दिल्या.**

# विंडीजचे दिग्गज क्रिकेटपटू सोनी रामदीन यांचे निधन

**किंग्जटन** : वेस्ट इंडिजचे दिग्गज फिरकीपटू सोनी रामदीन यांचे निधन झाले आहे. ते ९२ वर्षांचे होते. १९५० साली इंग्लंडच्या भूमीवर पहिल्यांदा मालिका जिंकणाऱ्या विंडीज संघाचे सोनी सदस्य होते. त्यांच्या निधनाची माहिती दिली. सोनी यांच्या नावावर आजही एक विश्वविक्रम आहे, जो ६५ वर्षांतही कोणी मोडू शकलेला नाही. सोनी यांनी १९५७मध्ये कसोटी डावात सर्वाधिक चेंडू टाकण्याचा विक्रम केला होता. १९५०मध्ये ओल्ड ट्रॅफर्ड येथे इंग्लंडविरुद्ध पदार्पण करणाऱ्या सोनी यांनी आपल्या कारकिर्दीत ४३ कसोटी सामने खेळले आणि २८.९८च्या सरासरीने १५८ बळी घेतले.

# कर्जतमध्ये राज्यस्तरीय रेनबो कराटे चॅम्पियनशिप

**कर्जत : प्रतिनिधी**

आठव्या राज्यस्तरीय रेनबो कराटे चॅम्पियनशिपचे कर्जतमध्ये आयोजन करण्यात आले असून या स्पर्धेचे उद्घाटन झाले. या स्पर्धेत राज्यभरातील साडेपाचशे कराटेपटू सहभागी झाले आहेत.

कर्जतमधील रॉयल गार्डन सभागृहात आंतरराष्ट्रीय कराटे बुडोकान ऑस्ट्रेलिया संलग्न रेनबो बुडोकॉन कराटे अकादमी आयोजित आठवी रेनबो स्पर्धा होत आहे. स्पर्धेचे उद्घाटन ब्लॅकबेल्ट वसंत शेट्टी यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी शरद बडेकर, हनुमंत गायकर, नरेश बडेकर, अॅड. गोपाळ शेळके, संजय आठवले, अनंत खुळे, राजेंद्र भोसले आदी उपस्थित होते.

या स्पर्धेत मुंबई, ठाणे, रायगड, पालघर, सांगली, सातारा आदी ठिकाणाहून कराटेपटू सहभागी झाले आहेत. स्पर्धा तीन गटांत होत आहे. स्पर्धेचे परीक्षक म्हणून वसंत शेट्टी, नरेश बडेकर, विशाल गायकवाड काम पहात आहेत, तर स्पर्धेचे सूत्रसंचालन पांडुरंग आहिर करीत आहेत.













दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com